# कुलदीपक



नासा येवतीकर

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# कुलदीपक

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

कथासंग्रह

# कुलदीपक

लेखक: नागोराव सा. येवतीकर (नासा)

# कुलदीपक

लेखक : नागोराव सा. येवतीकर ( नासा )
पत्ता : मु. येवती पोस्ट येताळा,
ता. धर्माबाद जि. नांदेड
मोबाईल क्रमांक :- 9423625769
Email id - nagorao26@gmail.com
Blog address - http://nasayeotikar.blogspot.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : १९ फेब्रुवारी २०२१(शिवजयंती)

©esahity Pratishthan®2021

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

नाव : नागोराव सा. येवतीकर ( नासा )

पत्ता : मु. येवती पोस्ट येताळा,

ता. धर्माबाद जि. नांदेड

मोबाईल क्रमांक :- 9423625769

Email id - nagorao26@gmail.com

Blog address - http://nasayeotikar.blogspot.com

व्यवसाय : विषय शिक्षक

जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा धर्माबाद

ता. धर्माबाद जि. नांदेड

जन्मदिनांक : 26 एप्रिल 1976

# ना सा येवतीकर



शिक्षकी पेशाकडे काही शिक्षक उपजीविका म्हणून पहातात तर काही जीविका म्हणून पहातात. शिकवणं हाच त्यांच्या जीवनाचा मूलाधार असतो. नासा सर या दुसऱ्या प्रकारचे शिक्षक आहेत. हाडाचे. त्यांच्या रक्तात लाल, पांढऱ्या पेशींबरोबरच खडू आणि फ़ळयाच्या काळया पांढऱ्या पेशीसुद्धा सापडतील असे अस्सल शिक्षक.

व्यवसायाने ते प्राथमिक शिक्षक (जिल्हा परिषद प्राथमिक कन्याशाळा, धर्माबाद, ता. धर्माबाद, जि. नांदेड) आहेत.

शालेय जीवनापासुनच लिखाण करण्याची फारच आवड होती त्यामुळे आजपर्यंत विविध वर्तमानपत्र, दैनिक, साप्ताहिक, मासिकात 900 च्या वर वैचारिक लेख प्रसिद्ध झाले आहेत. जीवन-शिक्षण या शैक्षणिक मासिकातून सुध्दा यापूर्वी लेख

प्रकाशित झाले आहेत. दैनिक लोकपत्रमध्ये दर सोमवारी ऑफ पिरियड सदराखाली एक वर्ष स्तंभलेखन केले आहे, ज्यात शैक्षणिक विषयी विचार मांडले होते.  लहान मुलांसाठी सुध्दा छोटेखानी लेख लिहिले असून मनोरंजनातून शब्दसंपत्ती वाढवी यांसाठी विविध मनोरंजक शब्दकोडे तयार केले आहे. जे की दैनिक देशोन्नतीच्या फनक्लब पेजवर प्रकाशित झाले आहेत.  यापूर्वी ई साहित्यमधे संवेदना, मी एक शिक्षक, जागृती, शाळा आणि शिक्षक, हिंदू सण, रोज सोनियाचा दिनू हे वैचारिक लेख असलेले ई बुक, सारीपाट कवितासंग्रह आणि हरवलेले डोळे हा ई कथासंग्रह प्रकाशित करण्यात आले आहे. कविता करण्यासोबत लघुकथा लिहिण्याचा छंद देखील गप्प बसू देत नाही. म्हणूनच हा कथासंग्रह आपल्या हाती देतांना विशेष आनंद होत आहे. काव्यांगण रोज एक कविता नावाचा नवोपक्रम खास शालेय विद्यार्थ्यांसाठी राबविला आहे. या संग्रहात मानवी जीवनाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणाऱ्या व्यक्तिमत्वाविषयी लेखन केले आहे जे की वाचकांना नक्की आवडतील. विद्यार्थ्यांना सतत नाविन्यात रमववण्यासाठी ते विविध उपक्रम तयार करतात आणि त्यां उपक्रमाच्या माध्यमातून शिकविण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. नासा सरांचे अजून एक वैशिष्ट्य आहे. लोकांना लिहिते करण्याचा ते सदैव प्रयत्न करत असतात. त्यासाठी ते अद्ययावत साधनांचाही वापर करतात.

नासांचे आठवे पुस्तक “कुलदिपक” हा कथासंग्रह प्रसिद्ध करताना आम्हाला अभिमान वाटतो. या कथासंग्रहातील कथा या संस्कारक्षम मुलांसाठी तर आहेतच पण मोठ्यांनाही आवडतील. कृपया आपले अभिप्राय नासा सरांना कळवा. त्यांचा संपर्क क्रमांक 9423625769 असून nagorao26@gmail.com हा त्यांचा मेल पत्ता आहे.

नासा हे सातत्यपूर्ण लेखक आहेत आणि आपले लेखन त नियमित रित्या ब्लॉगवर प्रसिद्ध करत असतात. त्यांचा http://nasayeotikar.blogspot.com हा ब्लॉग तुम्हाला नक्की आवडेल.त्यांच्या संपर्कात रहा. तुमचे विचार त्यांच्यापर्यंत पोहोचवा. नासांच्या तळमळीने चाललेल्या नवभारतनिर्माणात आपण सामिल व्हा.

आम्ही तर आहोतच.

सुनील सामंत

टीम ई साहित्य प्रतिष्ठान

अर्पण पत्रिका

या कथा संग्रह निर्मितीसाठी

प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या प्रोत्साहित करणारे

माझ्या असंख्य वाचक मित्रांसह

आई-वडील,

पत्नी

आणि

मुलांना

अर्पण

# कुलदीपक

## कथासंग्रह

सदरील कथासंग्रहामधील सर्व कथा ह्या काल्पनिक असून कथेतील नावं, स्थळं आणि पात्र हे देखील काल्पनिक आहेत. कदाचित  या कथेतील नावे आणि पात्र वास्तवातील कोणाशी जुळत असतील तर तो निव्वळ योगायोग समजावा.

अनुक्रमणिका

01) रमेशचे शौर्य

02) नाम्या सरपंच झाला

03) सर्कस

04) फेसबुक फ्रेंड

05) व्यर्थ न हो बलिदान

06) आईचे घर

07) मैत्रीचं झाड

08) सायकल गेली चोरीला

09) रेल्वेतील शाळा

10) गावाची आठवण

11) परतफेड

12) ब्लू व्हेल

13) टोकाचे पाऊल

14) कुलदीपक

15) गोष्ट एका आंबेगावाची

16) भिजवणारा पाऊस

17) पाच रुपये

# 01) रमेशचे शौर्य

पारगावाच्या रमेशने पाण्यात वाहून जाणाऱ्या दोन मुलांचे जीव वाचविले दैनिकांत ही बातमी प्रकाशित झाली तशी रमेशचे पंचक्रोशीत नाव झाले. प्रत्येकजण रमेशचे तोंड भरून कौतुक करू लागले. पारगावाच्या ग्रामपंचायतीने देखील त्यांच्या शौर्याची दखल घेऊन त्याला सन्मानित केले. सर्वत्र त्याच्या नावाचा जयजयकार सुरू होता. रामपूरच्या प्रशालेने देखील त्याचा परिपाठात यथोचित सन्मान करण्यात आला ज्याठिकाणी तो आठव्या वर्गात शिकत होता. रमेशला आकाश ठेंगणे झाल्यासारखे वाटत होते. रमेशच्या आईबाबांना देखील त्याच्या या शौर्याने अभिमानाने छाती फुलून आली होती. मित्रांनी देखील त्याचे फुल देऊन अभिनंदन केले. हळूहळू ही गोष्ट तालुक्याच्या कार्यालयामार्फत मंत्रालयापर्यंत पोहोचली. सोशल मीडियाने रमेश चे कार्य खूप वायरल केले. विविध दैनिकांनी देखील त्याची ती शौर्य कथा प्रकाशित केली. म्हणूनच पंतप्रधान कार्यालयातून रमेशला अभिनंदनाचा एक पत्र मिळाले, ज्यात त्यास यावर्षीचा बाल शौर्य पुरस्कार जाहीर करण्यात आल्याचे कळविले होते. ते

पत्र वाचून त्याला खूप आनंद झाला. रमेशने जे कार्य केले ते खरोखरच अभिनंदनीय आणि स्तुती करण्यासारखे होते. असे काम करायला धाडस लागते आणि स्वतःचे जीव धोक्यात घालण्याची धमक लागते.

पावसाळ्याचे दिवस होते. सायंकाळचे तीन वाजले होते. सर्वत्र काळा कुट्ट अंधार व्हावा असं आभाळ भरून आलं होतं. शाळा सुटायला अजून एक तास शिल्लक असतांनाच जोराचा पाऊस सुरू झाला. पावसाळा सुरू होऊन एखादा महिना उलटला होता आणि एक दोन पाऊस पडून गेले होते. आज मात्र खूप पाऊस पडणार असे संकेत दिसत होते. सलग एक तास जोराचा पाऊस पडला. सर्वत्र पाणीच पाणी झाले. घंटा वाजली आणि शाळा सुटली तसे पारगावचे सर्व पोरं गावांकडे जाण्यास निघाली. काही सायकलवर होती तर काही पायी चालत निघाले होते. रमेशजवळ सायकल नव्हती. त्याचे वडील गावात रामराव पाटलांच्या मळ्यात सालगडी म्हणून काम करत. घरची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे सायकल घेणे अशक्य होते. पारगाव पासून रामपूरची शाळा तीन किमी अंतरावर होती. पोरं हसत खेळत अर्ध्या तासात जात. सायकल वर जाणारी पोरं पंधरा मिनिटात जात. रमेश आपल्या मित्रांसोबत पायी निघाला तर बाकीचे मित्र सायकलवर पुढे निघाले होते. पारगाव आणि रामपूरच्या मध्ये एक छोटा नाला

होता. जेथे की पाऊस पडला की पूर येतो. आज ही पूर येण्याची भीती होती म्हणून सरांनी मुलांना सक्त सूचना दिली होती की, पुलाच्या वरून पाणी वाहत असेल तर पाण्यातून जाऊ नका, थोडा वेळ थांबा, पूर ओसरू द्या मग जा. मुलांनी सर्वांनी होकार देऊन निघाले. सायकलवरची मुले वेगात पुढे गेली आणि नाल्याजवळ जाऊन थांबली. पाऊस खूप पडल्याने त्या नाल्याच्या पुलावरून पाणी वाहत होते. कोणीही पुढे जाण्याची हिंमत करत नव्हते. मात्र कृष्णा आणि सचिन हे दोघे या पाण्यातून तिकडे जाऊन दाखवणारच म्हणून शर्यत लावत होते. इतर सर्वजण त्यांना तसे करू नका, पाणी खूप जास्त आहे आणि पुराचा वेग ही जास्त आहे, तेंव्हा अशी शर्यत काही कामाची नाही. असे मुले म्हणू लागले तोपर्यंत त्या दोघांत शर्यत लागली आणि दोघे ही त्या पुराच्या दिशेने निघाले. पाऊस थांबला होता मात्र वरच्या दिशेतून पाण्याचा जोर जास्त होता म्हणून पुरातले पाणी खूप वेगाने खालच्या दिशेने फेकले जात होते. त्या पुरात पूल कोठे आहे याचा अंदाज देखील घेता येत नव्हते. कृष्णा आणि सचिन हातात सायकल धरून त्या पुरात घुसले. चार पाच पाऊल टाकले न टाकले पाण्याने त्या दोघांनाही आत ओढून घेतले आणि दूरवर ढकलण्यास सुरुवात झाली. त्याबरोबर ते दोघे वाचवा वाचवा म्हणून ओरडू लागले. बाजूला उभे राहिलेले त्यांचे मित्र हे सारे पाहत होते मात्र कोणी ही

त्यांना वाचविण्यासाठी पुढे आले नाहीत. त्याच वेळी रमेश व त्यांचे मित्र चालत चालत त्या नाल्यापर्यंत आले. कृष्णा आणि सचिनचा आवाज कानावर पडता क्षणी रमेश क्षणाचाही विचार न करता हातातील दप्तर मित्रांकडे दिला आणि त्या पुराच्या दिशेने उडी मारली. अगोदर कृष्णाच्या गळयातील शर्टाचा कॉलर हातात धरून त्याला बाहेर काढलं आणि त्यानंतर त्याच पद्धतीने सचिनला देखील काढलं. पाण्याचा प्रवाह खूप वेगात होतं मात्र रमेश पोहण्यात खूपच हुशार होता त्यामुळे त्याने ही जोखीम उचलली आणि दोघांचेही जीव वाचविला. थोड्या अंतरावर त्यांच्या दोन्ही सायकल झाडाजवळ अडकले होते. पूर ओसरल्यावर सर्व मुले गावाकडे सुखरूप परत आली. हा हा म्हणता ही बातमी संपूर्ण गावात पाहोचली. काही पत्रकार मंडळीनी फोनवर सर्व माहिती घेतली आणि दैनिकांत प्रकाशित देखील केली. कृष्णा आणि सचिनचे आईवडिलांनी रमेशच्या घरी येऊन धन्यवाद दिले. वास्तविक पाहता कृष्णा आणि सचिन या दोघांनी रमेशला नेहमी चिडवित असत. कधी त्याच्या कपड्यावरून तर कधी त्याच्या चपलावरून ते दोघे रमेशची खिल्ली उडवयाचे मात्र यावर रमेश काही न म्हणता सोडून देत असे. हे दोघे मला नेहमी चिडवितात तेंव्हा मी कशाला यांना वाचवू असे त्याच्या मनात कधीच आले नाही. एक माणुसकी म्हणून रमेशने हे कार्य केले. त्याची गरीब

परिस्थिती पाहून कृष्णा आणि सचिनच्या घरच्यांनी त्याच्या संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी घेतली. हे सर्व आनंदाच्या गोष्टी होत असताना रमेश मात्र सुरेशचे आभार मानत होता.

उन्हाळ्याचे दिवस होते. उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढत होता. शाळेला सुट्या लागल्या होत्या. सकाळी क्रिकेट खेळणे, आंब्याच्या झाडाला दगड मारून आंबे पाडणे आणि मीठ लावून खाणे, चिंचा पाडणे, सूरपारंब्या खेळणे आणि गावाच्या बाजूला असलेल्या नदीमध्ये पोहायाचे हा सुट्टीतील रमेशचा वेळापत्रक. सोबत त्याचा मित्र सुरेश देखील असायचा. रमेश आणि सुरेश यांची खूप दाट मैत्री होती. कारण पहिल्या वर्गापासून ते शेजारी शेजारी बसायचे आणि त्याचा हजरी क्रमांक देखील मागोमाग असायचे. सर्व खेळ खेळायचे मात्र नदीत पाण्यात पोहायचे म्हटले की, रमेश नदीच्या काठावर बसायचा आणि सर्व मित्रांचे कपडे सांभाळायचे. एके दिवशी असेच सर्व मित्र पोहण्यासाठी गेले. रमेश नदीच्या काठावर बसून राहिला होता. मात्र रमेशला काही कळण्याच्या आत त्याचा मित्र सुरेशने त्याला पाण्यात ढकलले. पाणी चांगले मानेपर्यंत होते. पण रमेशला पाण्यात भीती वाटत होती. सुरेशने त्याला पोहण्यास शिकवितो असे म्हटल्यामुळे तो पाण्यात उभा राहिला. पाण्यात पाय वर करण्याचा प्रयत्न केला की त्याला डुबल्यासारखेच होऊ लागलं. पोट खाली करून पोहणे तर

जमतच नव्हते. शेवटी सुरेशने त्याच्या कमरेचा कडदोरा धरला आणि त्याला हातपाय हलविण्यास सांगितले. तेंव्हा कुठे पोहता येऊ शकते असे वाटले. दुसऱ्या आणि तिसऱ्या दिवशी रमेश स्वतःहुन पाण्यात शिरला, सुरेशने त्याला पोहायला शिकवित होता. काही दिवसांत रमेश छान पोहू लागला. आता नदीत मध्येपर्यंत जात होता आणि एक एक तास पाण्यात राहत होता. काही दिवसांत तो पट्टीचा पोहणारा झाला. सुरेशने पोहणे शिकविल्यामुळेच मागे पुढे जरा देखील विचार न करता रमेशने पुरात उडी घेतली आणि दोघांचे जीव वाचविले होते. प्रजासत्ताक दिनी राष्ट्रपतीच्या हस्ते बाल शौर्य पुरस्कार देऊन राष्ट्रपती त्यांचा सत्कार केला त्यादिवशी सुरेश देखील सोबत होता. तो त्याचा वर्गमित्र होता पण पोहणे शिकविण्यात तो त्याचा गुरू होता. उन्हाळ्यात पोहणे शिकलेल्याचा कुठे तरी फायदा झाला याचा आनंद रमेश आणि सुरेशच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता.

# 02) नाम्या सरपंच झाला

खारपूर गाव नदीच्या काठावर वसलेले जेमतेम पंधराशे लोकवस्तीचं छोटेसे गाव. त्या गावात सर्वच जाती धर्माचे लोकं गुण्यागोविंदाने नांदत होते. कुठल्याही प्रकारचा भांडण तंटा, वाद विवाद नव्हते. हिंदू असो वा मुस्लिम असो किंवा अन्य कोणी प्रत्येकाचे सण उत्सव आनंदात साजरे होत असे. त्याला कारण ही तसेच होते, त्या गावचा सरपंच म्हणजे नामदेव. नामदेव हा त्या गावातील सर्वांचा आवडता व्यक्ती, त्याला या जगात कोणीच नव्हते. लहान असतांना म्हणजे नामदेव पाच वर्षांचा असताना त्याचे वडील कॅन्सरने गेले आणि आणि नामदेव दहाव्या वर्गात शिकतांना त्याची आई त्याला सोडून गेली. तसा तो अनाथ झाला. पण गावातील लोकांनी त्याला कधीच अनाथ असल्याची जाणीव करून दिली नाही. म्हणून नामदेव आज त्या गावाचा एक आदर्श सरपंच होऊ शकला. तो सरपंच कसा झाला ? खरंच नामदेव नशीबवान माणूस होता, लहानपणापासून त्याला गावाचा सरपंच व्हावे असे त्याला वाटत राही. त्याच्या पूर्वीचे जे सरपंच होते रामजी पाटील, एक रुबाबदार व्यक्तिमत्व, पिळदार मिश्या, पांढरा शुभ्र

पोशाख, केस पांढरे झाले असतील तरी रंग लावून काळे केलेले, पायात कोल्हापुरी चप्पल, आवाजात देखील भारदस्तपणा, त्यांना पाहून नामदेव ला नेहमी वाटत असे की, आपण सरपंच व्हावं.

शंकरराव आणि नर्मदा हे दोघे ही संत नामदेवांचे अस्सीम भक्त होते. पण लग्न झाल्यावर त्यांना पाच वर्षे कोणतेच मूल झाले नाही. म्हणून ते नामदेवांची आराधना केली. त्यांना एक पुत्र झाला त्याचे नाव ठेवले नामदेव. शंकररावाला खूप आनंद झाला. त्याने सर्व गावाला बुंदी च्या लाडूचे जेवण दिले. शंकररावाला तंबाखू खाण्याची खूप सवय होती. रात्री झोपताना देखील त्याच्या तोंडात तंबाखू कोंबलेले असायचे. या गोष्टीवर त्या दोघांचे अनेकदा भांडण देखील होत असे मात्र शंकरराव त्या गोष्टीकडे काना डोळे करत. शेवटी व्हायचे तेच झाले. तंबाखूने शंकररावला कॅन्सर झाले आणि नामदेव पाच वर्षांचा असतांना त्याचा मृत्यू झाला. नामदेवांची संपूर्ण जबाबदारी आत्ता नर्मदे वर येऊन पडली. पडेल ते काम करणे, लोकांच्या शेतात मजुरीला जाणे, शेजारच्या घरी कोणतेही काम करणे असे करत ती नामदेवाला शिक्षण देऊ लागली. नामदेव देखील तिच्या आईसारखाच खु कष्टाळू होता. आईसोबत सर्वांना कामात मदत करत होता. गावातल्या प्रत्येक लोकांच्या तोंडात एकच नाव " नाम्या ".

" नाम्या, इकडे ये, थोडसं दळून आण, दुकानातून सामान घेऊन ये, कपडे इस्त्री करून आण, पेपर घेऊन ये, दूध घेऊन ये, " अशी नाना प्रकारची कामे त्याला लोकं सांगायची आणि नामदेव कुरकुर न करता सर्वांची कामे करायचं. त्यामुळे तो सर्वांच्या गळ्यातील ताईत बनला होता. वयोवृद्ध लोकांची कामे करतांना त्याला विशेष आनंद वाटत होता. तर सरपंच रामजी पाटील काही काम सांगितले की अजून जास्त आनंद वाटायचा आणि उड्या मारत ते काम पूर्ण करायचं. एके दिवशी सकाळी सकाळी रामजी पाटलांनी नामदेवाला पेपर आणायला पाठविले. तो पळत गेला आणि पेपर घेऊन आला. रामजी पाटील पेपर वाचू लागले. पेपरमधली ठळक बातमीने रामजी पाटलांचे लक्ष वेधून घेतलं. पुढील वर्षीपासून सरपंचाची निवड थेट जनतेतून होणार. ही बातमी रामजी पाटलांनी मोठ्या आवाजात वाचली. लगेच नामदेवाकडे पाहून रामजी पाटील नामदेवाला म्हणाले, " नाम्या बातमी एकलंस का ? पुढच्या वर्षी सरपंचाची निवड जनताच करणार आहे. तुला सर सगळं गाव ओळखते, तू होशील काय सरपंच ? सरकार भी लई येड्यावानी वागतंय, आताची पद्धत काही चूक हाय का ? " यावर नामदेव काय बोलणार. तो तसाच निघून गेला. दहावीच्या वर्गात असतांना नामदेवासोबत अजून एक दुर्दैवी घटना घडली. त्यादिवशी नर्मदेच्या अंगात खूप ताप चढला होता, कामाला जाऊ

नको असे म्हटले तरी ती बाजीराव पाटलांच्या शेतात कामाला गेली. दुपारपर्यंत काही वाटले नाही मात्र दुपारनंतर तिला कसे तरी होऊ लागले. म्हणून पाटलांनी तिला बैलगाडीत बसवून घरी पाठविले. नामदेव शाळेत गेलेला होता. नर्मदेला दवाखान्याची गरज होती पण कोणी तिला दवाखान्यात नेले नाही. तिला घरी सोडून सालगडी निघून गेला. तिचा ताप चढतच होता. सायंकाळी पाच वाजता नामदेव घरी आला. बघतो तर काय आईचा ताप खूप चढलेला होता. लगेच त्याने दवाखान्यात नेण्यासाठी आजूबाजूच्या मदतीने बैलगाडी मागविली. दवाखान्याकडे तो निघाला. मात्र अर्ध्या रस्त्यातच नर्मदेने आपला जीव सोडली. नामदेवाला पोरके करून ती देवाघरी निघून गेली. नामदेव आता आई-बाबा विना अनाथ आणि पोरका झाला होता. दहावीचं वर्ग पूर्ण होणार की नाही अशी स्थिती निर्माण झाली होती. मात्र गावातल्या लोकांनी त्याला धीर दिलं. सर्वतोपरी त्याला मदत केली. म्हणून तो जगू शकला. कसेबसे दहावी उत्तीर्ण झाला. पुढील शिक्षण बंद करून गावातच तो पडेल ते काम करू लागला. ज्यांच्या घरचे काम केले त्यांच्याच घरी त्या दिवशी त्याला जेवायला मिळू लागले. काही वर्षे उलटली आणि गावात सरपंच पदासाठी निवडणूक जाहीर झाले. यावर्षी थेट लोकांमधून सरपंचाची निवड होणार होती. तसेच सरपंच पदाची जागा नामदेवच्या जातीसाठी सुटला होता. त्या

गावात त्याचे एकच घर होते. त्याला प्रतिस्पर्धी कोणीही नव्हता. सर्व गावकऱ्यांनी एक बैठक घेतली आणि बिनविरोध सरपंचाची निवड करण्याचे ठरविले. अर्थात सरपंच म्हणून फक्त एकच नाव ते म्हणजे नामदेव. ग्रामसभेचा ठराव जिल्हा कार्यालयाला पाठविण्यात आले. कालचा नाम्या आज सरपंच नामदेव झाला. त्यासोबत गावाची लॉटरी लागली. निवडणूक बिनविरोध झाली म्हणून सरकार तर्फे एक लाख रुपयांचे बक्षीस देखील मिळाले. गावाला देखील खूप आनंद झाला. नामदेवाने ते लाख रुपये सर्वात पहिल्यांदा शाळेला देऊन त्या गावातल्या शाळेची डागडुजी आणि दुरुस्ती केली. शाळा हेच प्रत्येक गावाचे दैवत व्हायला पाहिजे अशी त्याची धारणा होती. ग्रामपंचायतीला मिळालेल्या निधीतून नामदेवाने यापूर्वी कोणी केले नाही असे कार्य करायला सुरुवात केली. तो एकटाच होता. त्याच्या मनात कसलाच स्वार्थी विचार नव्हता. त्यामुळे कुठे ही भ्रष्टाचार न करता नामदेवाने गावाचा पूर्ण कायापालट केला. म्हणूनच खारपूर गावच्या सरपंच नामदेवांचे नाव सर्वजण आदराने घेतात. रामजी पाटील एकदा सहज म्हटले होते की, नाम्या तू सरपंच होशील का ? त्या दिवशीपासून त्याच्या मनात ते वाक्य घोळत होतं. मी एके दिवशी या गावचा सरपंच होणार. त्याचे स्वप्न पूर्ण झाले आणि बातमी पेपरात देखील आली पण ती बातमी वाचायला रामजी पाटील हयात नव्हते. मनोमानी

रामजी पाटलांना नमस्कार करून नामदेव नित्यनेमाच्या कामाला लागला. गावातल्या सर्वांच्या मदतीचे उपकार या माध्यमातून फेडण्याचे त्याने ठरविले होते.

# 03) सर्कस

सर्कस बघायला जाऊ चल असे आपल्या आईजवळ सकाळपासून विजय एकच हट्ट धरला होता. शेवटी त्याचा हट्ट मान्य करण्यात आला. सायंकाळी पाच वाजताच विजय तयार होऊन बसला होता. सायंकाळचा शो सात वाजता सुरू होणार होता. सर्कस शहरात सुरू होऊन जेमतेम पंधरा वीस दिवसांचा काळ लोटला होता. एका ऑटो रिक्षातून मात्र त्याची मोठ्या प्रमाणात जाहिरात करण्यात येत होती. विजयच्या घरासमोरून दिवसातून सकाळ आणि संध्याकाळ ती गाडी फिरत होती. त्याच्या भोंग्यातून मेरा नाम जोकर चित्रपटातील ए भाय जरा देख के चलो हे गीत सदा न कदा वाजत होते. त्या गाण्याची धुन कानावर पडली की विजय पळत घराबाहेर यायचा आणि त्या ऑटोवरील विविध चित्राकडे न्याहाळून पाहायचा. सायकलवरील ती फिरणारी मुले, वाघ, सिंह, आणि हत्ती त्याचे लक्ष वेधून घ्यायचे. त्यामुळे कधी एकदा सर्कस पाहायला जातो असे त्याला वाटू लागले. जवळपास त्याच्या सर्व मित्रांनी सर्कस पाहून घेतले होते. पण बाबांना सुट्टी मिळत नव्हती म्हणून सर्कसला जाणे लांबत होते. शेवटी त्याची प्रतीक्षा संपली.

आज ऑफिसमधून लवकर निघण्याची मुभा मिळाली होती. म्हणून आई-बाबा आणि विजय हे तिघे जण आपल्या स्कुटीने सर्कस पाहण्यासाठी बाहेर निघाले. सर्कसची बाहेरील बाजू पाहून विजयच्या मनात उत्कटता अजून वाढत होती. बाहेरून सर्व प्राणी त्याला दिसत होते. हे सर्व प्राणी आपणांस काय करून दाखवणार ? सर्कस म्हणजे खूप हसायचे ठिकाण असते असे कोठे तरी वाचल्याचे त्याला आठवले होते. हे प्राणी आपणांस कसे हसविणार ? असा विचार त्याच्या मनात येऊन गेला. बाबाने काउंटरवर जाऊन दोन फुल्ल एक हाफ तिकीट काढले आणि आई बाबांच्या सोबत तोही सर्कसच्या तंबूमध्ये प्रवेश घेतला. गोलाकार ढेऱ्या मध्ये सर्व लोकं बसलेले होते. बसण्याची व्यवस्था म्हणजे लाकडी फळीवर बसायचे. खुर्चीची तेथे सोय नव्हती. सर्वांना बघता यावे म्हणून स्टेडियममध्ये जसे बसण्याची व्यवस्था असते तशी व्यवस्था करण्यात आली होती. थोड्याच वेळात सर्कस सुरू होणार म्हणून जोकरने येऊन सांगून गेला. सर्कसची सुरुवात अगदी झक्कास झाली. पाच सहा मुले मुली आले आणि जमिनीवरच्या अनेक प्रकारच्या उड्या मारून दाखविले. तशा उड्या मला ही मारता येतील याचा विचार विजय करू लागला होता. अधूनमधून छोट्या उंचीचा जोकर विनोद करत होता त्यामुळे सारे लोकं हसत होते. चार पाच मुली सायकल घेऊन आले. सायकलवरच्या

विविध कसरती त्यांनी करून दाखविले. नंतर एका चाकाची सायकल घेऊन दोन मुली आल्या. त्यांनी त्या सायकल सोबत अनेक करामती केल्या. त्यांची ही कला विजय डोळे विस्फारून पाहत होता. एक जादूगार आला आणि त्याने जादूच्या अनेक कला लिलया करून दाखविले. त्यानंतर पिंजऱ्यात वाघ आणि सिंह घेऊन एक माणूस आला. त्याने काही इशारे केले तसे ते वाघ आणि सिंह करू लागले. हे पाहून विजयला त्या व्यक्तीची खूप कमाल वाटू लागले. कारण वाघ आणि सिंह पाहिले की अनेकांची पांढरी होते. मात्र यांनी तर त्या दोघांना त्याच्या मनासारखे वागवित होता. त्यास रिंगमास्टर म्हणतात ही माहिती विजयच्या बाबांनी त्याला दिली. त्यानंतर एक हत्ती आणि त्याचे छोटे पिल्लू घेऊन तोच रिंगमास्टर गोल रिंगणात आला. सुरुवातीला हत्तीला एक फुटबॉल देण्यात आले. मोठा हत्ती आपल्या सोंडेत बॉल धरून छोट्या हत्तीकडे फेकले की तो पायाने बॉल लोकांमध्ये लोटून देत होता. ज्या व्यक्तीजवळ ते बॉल जात ती व्यक्ती खुश होत असे. असाच एक मारलेला बॉल सरळ विजयच्या हातात आला तसा तो खूप आनंदी झाला. आनंदाने उड्या मारत त्याने बॉल परत केला. थोड्या वेळाने छोट्या हत्तीच्या सोंडेत बॅट देण्यात आले. आत्ता तो छोटा हत्ती पायाच्या ऐवजी बॅटने बॉल मारू लागला. ते ही सरळ बसलेल्या प्रेक्षकांत जात होता. जोकर लोकांमध्ये जाऊन बॉल

आणत होता. ह्या खेळात खूप मजा येऊ लागली. त्यानंतर हवेत उड्या मारण्याचे कसब दाखविण्यात आले. ते पाहून तोंडात बोटे टाकणे एवढंच बाकी होतं, असे ते कसरती करू लागले. खाली पडणार असे वाटत असतांनाच पकडल्या जायचे आणि वर निघून जायचे. खूपच रोमांचक खेळ होता तो. सर्वात शेवटी सर्कसमधील सर्व हत्ती आपल्या सोंडेत विविध साहित्य घेऊन आले. एकाने आपल्या सोंडेत महादेवाची पिंड आणले होते, त्याने मधोमध ते पिंड ठेवले. त्यानंतर एका हत्तीने त्यांच्या वर आपल्या सोंडेने पाणी शिंपडले. दुसऱ्या एका हत्तीने पिंडावर पुष्पमाला अर्पण केली. त्यानंतर एका हत्तीने अगरबत्ती फिरवली. सर्वात छोट्या हत्तीने आपल्या सोंडेने नारळ फोडले. मग सर्वांनी नमस्कार केला. विजयला हे शेवटचे दृश्य खूपच आवडले आणि त्या सर्कसमधला छोटा हत्ती तर त्याला खूपच आवडला होता. तो छोटा हत्ती खूपच क्युट दिसत होता. दोन तास कसे निघून गेले हे कळलेच नाही. घरी जातांना एका चांगल्या हॉटेलात जेवण करून ते तिघे घरी गेले आणि विजयला रात्री केंव्हा झोप लागली हे कळलेच नाही. सकाळ झाली. तसा तो उठला. सकाळच्या सर्व क्रिया संपवून स्नान झाल्यावर तो सरळ घरातील मंदिरासमोर उभा राहिला. हातात अगरबत्ती घेतली आणि देवाला ओवाळून नमस्कार केला. तसेच लगेच आईच्या देखील पाया पडण्यास विसरला नाही. हे सर्व

विजयची आई आश्चर्यकारकपणे पाहत होती. न राहवल्याने ती विचारली, विजय, हे कसे काय ? आज परीक्षा वगैरे आहे का ? यावर विजय म्हणाला, नाही गं आई, हत्ती प्राणी असून देवाची पूजा करू शकतो, मी तर शेवटी मुलगा आहे. मला ही देवाला नमस्कार करायलाच हवं. म्हणून आजपासून देवाला आणि तुम्हाला रोज सकाळी नमस्कार करणार. हे ऐकून आईने विजयला गळ्याला लावून घेतली आणि त्याचा गोड पापा घेतला. सोबत मनोमनी सर्कसचे ही धन्यवाद मानायला विसरली नाही.

# 04) फेसबुक फ्रेंड

नेहमीप्रमाणे रात्री अकरा वाजता नरेशने आपल्या मोबाईलवरील डाटा ऑन केला आणि फेसबुक चाळत बसला होता. तसं पाहिलं तर नरेशला दिवसभर थोडी सुद्धा उसंत नसते फेसबुक बघण्यासाठी. तो पंचविशीतला तरुण होता आणि जवळच्या शहरातील एका कंपनीत नोकरी करत होता. त्याच्या शिक्षणाला अनुसरून ती नोकरी होती. आय टी आय चे शिक्षण पूर्ण केले असल्यामुळे पहिल्यांदा त्याला संधी मिळाली. गेल्या तीन वर्षांपासून तो या कंपनीत नोकरी करत आहे. सकाळी आठ वाजता तयार होऊन जो बाहेर पडायचा तो रात्री दहा वाजता घरी यायचा. घरी आल्यावर हात-पाय तोंड धुतले की जेवण आटोपून घ्यायचा आणि मग मोबाईल हातात घ्यायचा. कंपनीत त्याच्या जवळ मोबाईल ठेवण्याची परवानगी नसायची. त्याचजवळ स्वतःची बाईक होती. साधारणपणे त्याचे घर ते कंपनी दीड तासाचा अवधी लागत असे. घरी आई वडील एक बहीण राहत होती. बहीण लहान नवव्या वर्गात शिकत होती. त्यादिवशी देखील तो मोबाईलवर फेसबुक पाहत पाहत एका फोटोवर येऊन थांबला. ती मुलगी दिसायला चांगली होती, पाहताक्षणी त्या फोटोला त्याने लाईक

केले आणि पुढे जाऊ लागला. फेसबुकवर त्याचे खूप मित्र होते. सर्वांना अपडेट देण्यासाठी तो रोज रात्री फेसबुक पाहत असे आणि रविवारी सुट्टीच्या दिवशी दिवसभर फेसबुकवरच राहत असे. यावरून बऱ्याच वेळेला त्याचे नि बाबांचे वाद ही झाले होते. पण नरेश काही ऐकायला तयार होत नसे. रात्री झोपणार म्हटले की एक मेसेज आला, ते त्याने उघडून पाहिले त्यावर लिहिले होते "थँक्स फॉर लाईक माय फोटो." त्याला क्षणभर आठवले नाही म्हणून प्रिया साळवे असे नाव होते त्यावर क्लिक केल्यावर तिचे प्रोफाइल उघडले गेले. लगेच कोणता फोटो लाईक केला होता म्हणून नरेश शोध घेऊ लागला. लगेच त्याच्या दृष्टीला परत एकदा तेच फोटो आले ज्याला नरेशने लाईक केल्याचे निळसर चिन्ह दिसत होते. तिला काही तरी उत्तर द्यावे म्हणून नरेशने "ओके यु आर वेलकम" असा मेसेज पाठविला आणि झोपी गेला. कारण रात्रीचे बारा वाजले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी उठला आणि नित्यनेमाने आपले काम उरकून कंपनीत निघून गेला. सायंकाळी घरी आल्यावर जेवण उरकून घेऊन अंथरुणात पडल्या पडल्या मोबाईल घेऊन फेसबुक पाहण्यास सुरुवात केली. थोड्याच वेळात एक मेसेज आला. "हॅलो, नरेश हाऊ आर यु ?" प्रियाचा मेसेज वाचून नरेश द्विधा मनस्थितीमध्ये पडला काय करू ? या विचारात होता. त्याने अगोदर तिचा प्रोफाइल चेक केला. तिचं नाव, शहर आणि

जन्मदिनांक साऱ्या बाबी चेक केल्यावर ती ज्याठिकाणी कंपनी आहे त्याठिकाणची राहणारी आहे आणि वय बावीस वर्ष असे दाखवीत होतं. मनात काही तरी विचार करून नरेशने तिला "हाय, आय ॲम फाईन" म्हणून मसेज केला. मग सुरू झाला त्यांचा फेसबुक संवाद. अनेक गप्पा गोष्टी करण्यात बाराच्या जागी एक वाजू लागले. दिवसभर तर त्याला मोबाईल बघता येत नव्हते मात्र रात्रीला तो हमखास प्रियाशी संवाद करू लागला. तिच्या प्रोफाईलला तोच एकमेव फोटो होता. त्याच्या व्यतिरिक्त एक ही पोस्ट तिच्या वॉलवर दिसत नव्हते. त्यांचे रोज रात्री उशिरापर्यंत गप्पा रंगू लागले. एकमेकांच्या भेटी न होता देखील ते जिवलग मित्र झाले होते. एके दिवशी नरेशने प्रियाला भेटण्यासाठी विनंती केली. तेंव्हा तिकडून ही लगेच होकार मिळाला. या रविवारी ताज हॉटेलमध्ये भेटण्याचे ठरले. दोघांचेही चेहरे एकमेकांना ओळखीचे झाले होते त्यामुळे कसे ओळखणार असा प्रश्न निर्माण होणे अशक्य होते. कधी एकदा रविवार उजाडतो असे झालं होतं. अखेर तो दिवस उजाडला. नरेश सुट्टी असून ही लवकर तयार झाला आणि शहरात जाण्यासाठी बाहेर पडताना त्याचे बाबा म्हणाले, "नरेश, अरे आज सुट्टी आहे, कुठं निघालास ?" यावर नरेश ने " थोडे काम आहे जाऊन येतो " म्हणून गाडीवर स्वार होऊन निघाला. बरोबर अकरा वाजता ताज हॉटेलमध्ये येऊन प्रियाची वाट पाहू लागला.

बारा वाजले, एक वाजले तरी प्रिया आलीच नाही. फोन करावं म्हटलं तर आपने डायल किया हुआ नंबर अभी बंद है, कृपया थोडी देर बाद डायल करे असे म्हणत होते. दिवसभर फोन बंद येत होता. काय करावं त्याला काही सुचत नव्हतं. शेवटी नाराज होऊन तो तसाच परत घरी गेला. त्यादिवशी रात्रभर त्याला झोप लागली नाही. फेसबुक वर " हाय " असा मेसेज टाकून ठेवला होता. पण त्याला काही रिप्लाय मिळालाच नाही. त्यामुळे तो खूपच नाराज झाला होता. सकाळ झाली आणि तो रोजच्या प्रमाणे कंपनीत गेला. सायंकाळी घरी आल्यावर झोपण्यापूर्वी फेसबुक सुरू केल्याबरोबर प्रियाचा मेसेज दिसू लागला,

"सॉरी, काल अचानक बाबांची तब्येत खराब झाल्यामुळे त्यांना घेऊन दवाखान्यात जावं लागलं म्हणून मी ताज हॉटेलात येऊ शकले नाही."

मेसेज वाचून नरेशने "इट्स ओके" म्हणून मेसेज टाकला.

"खरंच मला माफ करावं, तुम्हांला माझ्यामुळे खूप त्रास झाला."

"काही हरकत नाही, असो काय झालंय बाबांना"

"डॉक्टर म्हणत होते की खूप गंभीर आजार आहे, यासाठी हैद्राबाद किंवा मुंबईला जावे लागेल."

" आजार काय सांगितलं डॉक्टरांनी "

"ब्रेन ट्यूमर आहे असे म्हटलं आहे"

"बाप रे........! ब्रेन ट्यूमर"

"जवळपास दोन ते तीन लाख खर्च येणार असे सांगितले"

"दोन ते तीन लाख खर्च सांगितलं आहे, बाप रे मग पुढे...."

"काय करावं ? आमच्याकडे तर तेवढा पैसा नाही."

"मग काय करायचं ठरवलं आहे ?"

"पाहू, देवाच्या हातात आहे सर्व "

" काही मदत लागल्यास नक्की कळव, शुभ रात्री"

असा मेसेज करून दोघे ही झोपी गेले. परत दुसऱ्या दिवशी रात्रीला फेसबुक वर संवाद सुरू झाला.

"पुढे काय झालं ?" नरेश ने मेसेज केला. थोड्या वेळात तिने मेसेज केला " घरातले सर्व दागदागिने, घर हे सर्व एकत्र केले तर दीड लाख होत आहेत अजून दीड लाखाची गरज आहे, काय करावं काही कळत नाही."

"असं करू या का, आपण सोशल मीडियाच्या माध्यमातून मदत घेऊ या का ? "

" चांगली आयडिया आहे, मात्र लोकं मदत करतील काय ?"

" का करणार नाहीत, नक्की करतील."

" ठीक आहे तर, मग तुम्हांला जे योग्य वाटते ते करा"

"ठीक आहे मग असं करा, तुमचा अकाउंट क्रमांक आणि त्याचे डिटेल्स द्या, लगेच पोस्ट करतो."

"ठीक आहे पण, माझ्याकडे एकही बँक अकाउंट खाते क्रमांक नाही" असा तिने मेसेज केला. यावर नरेशने आपल्याच बँक अकाउंटची माहिती देऊन मदत जमा करण्याचे ठरविले.

नरेशने एक चांगली पोस्ट तयार केली आणि लोकांना मदत करण्यासाठी आवाहन केले. एक दिवस झाले, दोन दिवस झाले कोणी ही मदत करायला तयार नाही. त्याच्या खात्यात एक ही रुपया जमा होत नव्हता. प्रिया रोज रात्री एकच विचारत होती, किती पैसे जमा झाले ? यावर प्रियाचा मन राहावे म्हणून नरेश काही तरी रक्कम टाकत होता. असे करता करता त्याचा आकडा एक लाख रुपयापर्यंत पोहोचला होता. वास्तविकमध्ये त्याच्या खात्यात एक ही रुपया जमा झालेला नव्हता. आता नरेशलाच पैश्याची काळजी वाटू लागली. मी तर एक लाख रुपये जमा झाले आहेत म्हणून सांगितलो आता काय करायचे ? पंधरा दिवसानंतर प्रियाचा मेसेज आला " आज बाबाचं ऑपरेशन आहे, तेंव्हा तू एक लाख रुपये घेऊन ये." मेसेज वाचताच नरेशची पायाखालची जमीन सरकली. त्याने " ओके " असा मेसेज केला. आत्ता काय करावं ? हे कळत

नव्हतं. पैसे तर द्यावे लागणारच होते. दुसऱ्या दिवशी सकाळी तो उठला आणि बँकेतुन एक लाख रुपये घेऊन प्रियाच्या फोनचा वाट पाहत बसला. थोड्याच वेळात प्रियाचा फोन आला, ती म्हणाली, "बागेच्या बाजूला एक हॉटेल आहे, त्या हॉटेलमध्ये लाल शर्टाचा एक माणूस बसलेला आहे, त्याचे नाव बाबुराव आहे, त्याला ते पैसे दे. मी दवाखान्यात बाबाजवळ आहे म्हणून त्याला पाठविले आहे." नरेश तो पैसे घेऊन बागेजवळच्या हॉटेलमध्ये गेला. खरोखरच तिथे एक लाल शर्टाचा माणूस बसलेला होता. त्याला नाव विचारलं तो "बाबुराव " असे म्हणाला. नरेशला खात्री पटली. त्याने एक लाख रुपयांची बॅग त्याच्या हातात दिली आणि म्हणाला, "लवकर नेऊन दे प्रियाला." तो " होय लवकर देतो " असे म्हणत तेथून बाहेर पडला. नरेशला त्या एक लाख रुपयांचे काही वाटत नव्हते मात्र प्रियाचे वडील ठीक व्हावेत म्हणून प्रार्थना करू लागला. त्यादिवशी रात्री त्याने प्रियाला मेसेज केला

" एक लाख रुपये त्या लाल शर्टाच्या बाबुराव सोबत पाठविलोय, मिळाले ना ....बाबाची तब्येत कशी आहे ?

हा मेसेज करून एक दिवस उलटला, दुसरा, तिसरा तसे दहा दिवस संपले पण प्रियाचा काही रिप्लाय आला नाही. म्हणून त्याने प्रियाचा नंबर डायल केला तर आपने डायल किया हुआ नंबर

मौजुद नहीं है, एक बार नंबर चेक करे किती ही वेळा डायल केला तरी हेच वाक्य कानी पडत होते.  रोज रात्री फेसबुक ओपन करून तो प्रियाच्या रिप्लायची वाट पाहत होता. मेसेज ही नाही आणि फोन ही लागत नाही. फोन क्रमांक कोणत्या व्यक्तीच्या नावाने आहे याची माहिती घेऊन तेथे जाऊन पाहिलं तर त्या नावाची कोणतीच व्यक्ती इथे राहत नाही अशी माहिती मिळाली. नरेशला आता पूर्ण जाणीव झाली होती की, त्याची फसवणूक झाली आहे. ती प्रिया साळवे एक फेक अकाउंट आहे, फोन क्रमांक चुकीचा आहे आणि तिचा कोणता बाप आजारी नाही. आपण पुरता फसलो गेलो आहोत याची जाणीव झाली पण याची वाच्यता आपण कोठे केली तर लोकं आपल्यावरच थुकतील म्हणून त्याने कोठे ही काही सांगितले नाही. पोलीस  स्टेशनमध्ये सुद्धा नोंद केली नाही.

संजयने ( अन्य फेसबुक युजर, वय जेमतेम तेच 25-26) आपला फेसबुक ओपन केलं की, त्याची नजर प्रिया साळवेच्या त्याच फोटोवर स्थिरावली, त्याने त्या फोटोला लाईक केलं. थोड्या वेळाने त्याला एक मेसेज आला.

" थँक्स फॉर लाईक माय फोटो." मग सुरू झाला संजयला फसविण्याचा प्लॅन.

# 05) व्यर्थ न हो बलिदान

सकाळी सकाळी रेडिओ ऑन केल्या बरोबर ती बातमी कानावर पडली आणि सविताच्या काळजाचे ठोके वाढले होते. पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात 40 भारतीय सैनिक मारल्या गेल्याची ती बातमी होती. सविताने लगेच फोन हातात घेतला आणि एक नंबर डायल करायला लागली. आपने डायल किया हुआ नंबर अबी बंद है, थोडी देर बाद प्रयास करे वारंवार हेच वाक्य त्याच्या कानी पडत होता. जसा जसा वेळ जात होता तसा तसा तिची बैचेनी वाढतच जात होती. परम तिचा मुलगा नुकतेच जागी झाला होता. अंथरुणातूच त्याने " आई ए आई " असा आवाज दिला पण तिला काही ऐकू येत नव्हते. तो उठून आईजवळ आला आणि तिचा पदर धरून ओढू लागला त्यावेळी ती भानावर आली. लगेच तिने परमला तोंड धुण्यास सांगून सासू-सासऱ्याकडे वळली. सासू सासरे अंगणात बाजावर शून्य नजरेच्या दृष्टीत आकाशाकडे पाहत बसले होते. तिने दोघांना त्या बातमी विषयी सांगितले तरी ते दोघे गप्पच बसले होते. तिला काही कळत नव्हते. ती म्हणाली, मी ह्यांना फोन लावत आहे मात्र फोन लागतच नाही,

बंद आहे असे म्हणत आहे. काय भानगड आहे, मला तर काही सुचत नाही म्हणून ती घरातल्या खांबाला धरून तिथेच बसली. त्यावेळी आपलं मन घट्ट करून सासरा तिला म्हणाला, " विजया ला आता फोन लागणार नाही. त्या पुलवामा हल्ल्यात आपला विजय देखील गेला " हे कानावर पडताच सविताच्या पायाखालून जमीन सरकून गेल्या सारखं झालं. क्षणभर तिला काही सुचले नाही आणि ती बेहोश झाली. लगेच विजय चे आई-बाबा तिच्याजवळ गेले तोंडावर थोडंस पाणी मारल्यावर ती शुद्धीवर आली आणि हुंदके देऊन रडू लागली. आई का रडत आहे हे त्या परम ला काही कळत नव्हते. तो तिच्या जवळ जाऊन ए आई रडू नको ना, बाबांना खूप वाईट वाटते तू रडलीस तर" असे तो म्हणू लागला. बिचारा तो तीन वर्षांचा परम त्याला काय माहीत त्याचे बाबा आता या जगात नाहीत ते. आदल्या दिवशी रात्रीच विजय आणि सविता यांचे फोनवर बोलणे झाले होते. उद्या सकाळी आमची टीम जम्मू काश्मीर ला जात आहे त्यामुळे निदान एक आठवडाभर तरी आपले बोलणे होणार नाही. तेंव्हा आई-बाबा आणि परमची काळजी घे असे म्हणून त्यांचे फोनवरील बोलणे बंद झाली. सविता खूप आनंदात झोपी गेली. रात्री थोडी उशिरा झोपल्यामुले सकाळी जाग यायला वेळ लागली. ती उठण्याच्या अगोदर जम्मू काश्मीरहुन फोन आला होता की, दहशतवादी हल्ल्यात विजय ला वीरमरण

आले आहे म्हणून. ही बातमी सविता ला कसे सांगावे म्हणून विजयचे आई -बाबा काळजीत होते. मात्र त्यापूर्वीच सविताने त्या हल्ल्याची बातमी ऐकली. बातमीने संपूर्ण गाव शोकाकुल झाले होते. प्रत्येकजण विजयच्या घरी येऊन त्यांची सांत्वन करू लागले. थोड्या वेळाने देशपांडे गुरुजी आले, ज्यांच्यामुळे तो भारतीय सैन्यात दाखल झाला होता. गुरूजीला पाहताचा विजयच्या आई बाबांना शोक अनावर झाला. गुरुजींनी त्यांना खूप धीर दिलं. त्यांच्या सोबत इकडच्या तिकडच्या विषयावर गप्पा मारल्या, सर्वत्र स्मशान शांतता होती. गुरुजीला ते शाळेतले दिवस आठवले. सातवी पर्यंत आपल्या घराजवळच्या शाळेतील शिक्षण संपवून विजय गावातीलच दूरच्या जय जवान विद्यालयात शिकण्यासाठी पहिल्या दिवशी आपल्या बाबासोबत गेला होता. शाळेत पहिली भेट देशपांडे सरासोबत झाली. बाबांनी आपला मुलगा विजयची सर्व कहाणी सांगितली, हा अभ्यासात हुशार नाही मात्र खेळण्यात नंबर एक आहे. सर याला थोडी अभ्यासाची गोडी लावा. कसे ही करून दहावीत चांगले मार्क मिळेल असे करा." यावर देशपांडे सरानी बाबाचे हातात हात घेऊन विश्वास दिला की, आपली इच्छा नक्की पूर्ण होईल.

जय जवान विद्यालयात हजारो मुलं शिक्षण घेत होती. पूर्वीच्या शाळेत जेमतेम दोनशे मुलं होती, एका वर्गात 15-20 मुलं आणि

इथे मात्र एका वर्गात 50 च्या वर मुलं होती. तरी ही कुठे ही गडबड नाही गोंधळ नाही. सर्व काही शिस्तीत चालत होतं. जे काम सांगितलं गेलं ते काम वेळेत पूर्ण करणे अत्यावश्यक होते नाहीतर मुख्याध्यापक देशपांडे सर यांच्याकडे जावं लागायचं. सर तसे खूप कडक पण तेवढेच मायाळू होते. शाळेचे नियम समजावून घ्यायला काही दिवस लोटले. एके दिवशी वर्गात सूचना आली की, ज्यांना NCC मध्ये सहभागी व्हायचे आहे त्यांनी उद्या सकाळी सात वाजता मैदानावर हजर राहावे. विजयला NCC बाबत उत्सुकता वाटली म्हणून तो दुसऱ्या दिवशी सकाळी बरोबर सात वाजता मैदानावर हजर राहिला. पोलिसांच्या ड्रेसमध्ये एक व्यक्ती मुलोज्याठिकाणी थांबले होते तिकडे येत होते. ते जसे जसे जवळ येऊ लागले तसे चेहरा स्पष्ट दिसू लागला. जवळ आल्यावर विजय आश्चर्यकारक रीतीने त्या व्यक्तीला पाहू लागला. ती व्यक्ती दुसरी तिसरी कोणी नसून देशपांडे सर होते. लगेच सर्वांनी रांगेत उभे राहिले. सावधान विश्राम चे आदेश देऊन सरांनी सर्वांना खाली बसायला सांगितले. NCC काय आहे आणि याचे जीवनात काय महत्व आहे हे सर्व समजावून सांगितले. विजयला खूपच आवडले. लगेच त्याने NCC साठी आपले नाव पक्के केले. रोज सकाळी शाळेत NCC चा ड्रेस टाकून सात वाजता यायचे आणि परत घरी जाऊन पुन्हा शाळेचा गणवेश टाकून शाळेत यायचे असा त्याचा

दिनक्रम सुरू झाला. NCC मध्ये सहभागी झाल्यापासून त्याच्या मनात भारत देशाविषयी आणि भारतीय सैनिकांविषयी खूपच आदर निर्माण झाला होता. NCC मुळे विजय हा देशपांडे सरांचा आवडता विद्यार्थी बनला होता. कारण ही तसेच होते, त्याने एक ही दिवस गैरहजर राहिला नाही, धावण्याच्या शर्यतीत तो सर्वात पुढे असायचा, थंडीच्या दिवसात देखील तो वेळेवर हजर होता. त्याच्यामध्ये असलेली स्फूर्ती सरांनी हेरली होती. शहरातल्या टॉकीज वर बॉर्डर सिनेमा लागला होता. फक्त NCC च्या विद्यार्थ्यांना घेऊन देशपांडे सर सिनेमा पाहायला गेले. सिनेमा पाहतांना सर विजयच्या चेहऱ्याचे निरीक्षण करत होते. भविष्यात हा विद्यार्थी नक्की भारतीय सैनिक दलात समाविष्ट होईल. याची त्यांना खात्री होती. मात्र सरांना एकाच गोष्टीची चिंता होती की, विजय दहावी चांगल्या गुणाने पास व्हावे. सिनेमा संपला. सर्वजण बाहेर आले आणि आपापल्या घरी गेले. विजय मात्र तेथेच घुटमळत होता. सर म्हणाले, विजय काय झालं, जायचं नाही का घरी ? " यावर विजय थोडा वेळ विचार करून म्हणाला, " सर मला सैन्यात भरती होता येईल काय ? " सरांनी लगेच त्याच्या मनातील।सर्व कालवाकालव ओळखून म्हणाले, " ही सैन्यात भरती होता येईल, त्यासाठी दहावीची परीक्षा चांगल्या गुणाने पास होणे अत्यावश्यक आहे." विजयने लगेच " त्यात काय अवघड,

मी नक्की चांगल्या गुणाने पास होईन " त्यादिवशी पासून विजय खेळण्याबरोबर अभ्यासकडे ही लक्ष देण्यास सुरुवात केली. देशपांडे सर अधूनमधून त्याच्या प्रगतीकडे लक्ष देऊन होतेच. दहावीची परीक्षा संपली. देशपांडे सर परीक्षा संपल्यावर एकदा विजयच्या घरी आले. विजयच्या आई बाबांशी विजयला सैन्यात भरती होण्याविषयी चर्चा केली. बाबांनी लगेच होकार दर्शविला होता. मात्र विजयची आई सैनिकांत भरती म्हटल्याबरोबर तोंडावर पदर धरून रडत रडत घरात गेली. एकुलता एक मुलगा आहे. याला सैन्यात कसं पाठवावे ? सैन्यात गेलेले माणसं जिवंत येत नाहीत. असे नाना विचार करून ती रडू लागली. विजयने कसे बसे समजावून सांगितल्यावर त्याची आई तयार झाली. काही दिवसानी निकाल लागला. विजय प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाला होता. त्यानंतर त्याने बारावी देखील चांगल्या मार्कांने उत्तीर्ण झाला. त्यानंतर सैन्यात दाखल होण्यासाठी देशपांडे सरांना सोबत घेऊन तो निघाला. जाताना आई-बाबा यांना नमस्कार केला. आई अजूनही रडत होती. विजयचा सर्वच बाबतीत परफॉर्मन्स चांगला असल्यामुळे तो CRPF मध्ये निवडला गेला. सहा महिन्यानंतर त्याला सुट्टी मिळाली ते ही दिवाळीच्या मोसमात. दिवाळीला तो घरी आला सोबत खूप फटाके, आई बाबाना कपडे, लहान मुलांना मिठाई आणि मित्रांना अर्थातच मिल्ट्रीची दारू घेऊन आला.

त्याच्या येण्याने घरात आनंदी आनंद पसरला. त्याला पाहून आईला खूपच आनंद झाला. दिवाळी झाली. आईने विजयच्या लग्नाचा विषय काढला. बाबानी होकार दिला. विजयला मात्र आताच लग्न करायचे नव्हते. मात्र सविताचं स्थळ चालून आलं होतं, आई बाबा अगोदरच पाहिले होते, त्यांना सविता पटली होती फक्त विजयचा होकार त्यांना हवा होता. विजयने आई बाबांच्या विनंतीला मान देत सविताला पाहायला गेला. सविता ही दिसायला सुंदर आणि बारावी पास झालेली मुलगी होती. पाहताक्षणी विजयला देखील सविता आवडली. त्याने आईला होकार दर्शविला. एका महिन्याने सुट्टी संपणार होती. म्हणून एका महिन्यात लग्न करण्याचे ठरविण्यात आले. खूप घाई गडबडीत पण धुमधडाक्यात लग्न सोहळा पार पडला. विजयच्या आई बाबांना आधार देण्यासाठी आता सविता होती म्हणून विजयला चिंता नव्हती. लग्न झाल्यानंतर पाचव्या दिवशीच विजय सैन्यात जाण्यास निघाला. यापूर्वी आईचा चेहरा रडवेला होता आता त्यात सविताचा भर पडली. काळजी करू नको रोज सायंकाळी फोन करत जाईन असे म्हणून विजयने सर्वांचा निरोप घेतला. लग्न लागून पाचच दिवसानी विजय निघून गेल्याने सविताला अस्वस्थ वाटू लागले होते. तिच्या मनाची चलबिचल तिच्या सासूने ओळखेल आणि काही दिवस माहेरी जाण्यास परवानगी दिली. सासर-माहेर

करत ती दिवस काढत होती. पुन्हा सहा महिन्यांनी विजय सुट्टी घेऊन गावी आला. ते पावसाळ्याचे दिवस होते. महिनाभर सुट्टी मिळाली होती. आई बाबा विजय आणि सविता सर्वजण शेतात जाऊन सरकी लावण्याचे काम केले. देशपांडे सरांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतली. तसं प्रत्येक सुट्टीत गावी आल्यावर सरांची भेट घेतल्याशिवाय तो राहत नसे. सुट्टीचा एक महिन्याचा काळ कसा संपला हेच कळाले नाही. सुट्टी संपली. तसा विजय आपल्या बॅगची पॅकिंग करून सैन्यात जाण्यास निघाला. परत जातांना आई आणि सविता यांचे डोळे भरलेले होते. काळजी घ्या म्हणून तो बाहेर पडला.

एके दिवशी अचानक सविता पोट दुखू लागले म्हणून कण्ह लागली. आईने तिला दवाखान्यात नेलं तर तेथे आनंदाची बातमी मिळाली की, सविता आई होणार आहे. सर्वांना खूपच आनंद झाला. त्याच रात्री फोनवर ही आनंदाची बातमी विजयला कळाली. तो ही आनंदून गेला. शेतात पीक जसे वाढू लागले तसे सविताचा गर्भात बाळ वाढू लागले. दिवाळीच्या सुट्टीत विजय परत गावी आला. यावेळी देखील त्याने खूप फटाके, कपडे, मिठाई आणि दारू आणली होती. विजयला खास करून आनंद झाला करण तो बाप बनणार होता. सुट्टी संपवून तो परत गेला. दिवाळी संपल्याचा चार पाच महिन्यांनी सविताला गोंडस मुलगा झाला.

त्यांनी त्याचे नाव परम असे ठेवले. विजयच्या घरात आनंदी वातावरण तयार झाले. परमच्या येण्याने सर्वांना करमणूक होऊ लागली. सविता, आई आणि बाबा हे दिवसरात्र त्या परम सोबत खेळण्यात घालवू लागले. पाहता पाहता आता परम तीन वर्षांचा झाला होता. त्याच्या बोबड्या बोलाने सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. यावर्षी दिवाळीला विजयला दहा दिवसाची सुट्टी मिळाली होती. यावेळी देखील येतांना त्याने खूप मिठाई, कपडे, फटाके आणि परमसाठी खेळणे आणले होते. बघता बघता दिवाळीचे दहा दिवस संपले होते. सैन्यात जाण्याचा दिवस उगवला. सर्वांना एकदाचे डोळे भरून पाहून घेतला, हवेत हाताने बाय बाय केला आणि निघाला. कधी नाही ते यावेळी परम म्हणाला, "पपा, लवकर या" त्याला नुसते मानेने हो म्हणून विजय निघून गेला. त्याला जाऊन पंधरा वीस दिवस झाले नव्हते की, त्यांची टीम जम्मू काश्मीरला जात असल्याचे रात्री त्याने सविताला फोनवर कळविले होते. तेच शेवटचे बोलणे झाले. पुलवामा हल्ल्यात विजयला देखील वीरमरण आले होते. काही वेळानंतर त्याची डेडबॉडी तिरंग्यात लपेटून शासकीय वाहनात आले. त्यावेळी एकच रडारड सुरू झाली. परमला काहीच कळत नव्हते. त्याला फक्त बाबांचा फोटो तेवढा दिसत होता. शहीद विजय अमर राहे चा नारा सर्वत्र घुमघुमत होता. तीन वर्षांचा परम आपल्या पित्याच्या सरणाला अग्नी दिला.

सैनिकांनी तोफेची सलामी दिली. खूप वेळ रोखुन धरलेल्या अश्रूंना विजयच्या बाबानी मोकळी वाट करून दिली. सर्वांनी दोन मिनिटं स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहिली. देशपांडे सरांनी व्यर्थ न हो बलिदान असा नारा दिला. सर्वांनी अमर रहे .....! अमर रहे .....! असा नारा दिला.

# 06) आईचे घर

अजय आणि विजया यांच्यात कडाक्याचे भांडण झाले. भांडण एवढं मोठं होतं की, अजयला खूप मोठा आणि महत्वाचा निर्णय घ्यावा लागला. ज्यामुळे त्याचे मन तयार नव्हते पण त्याला तो निर्णय घ्यावं लागलं. विजयाला देखील त्याच्या निर्णयाने आश्चर्य वाटलं. अजय असा निर्णय घेऊ शकतो असे तिला कधीच वाटले नाही. तिला आता आपली चूक लक्षात येऊ लागली होती पण अजय ऐकण्याच्या मनस्थितीमध्ये नव्हता. तसे पाहिले तर विजयाला तिच्या संसारात कसल्याच बाबतीत कमतरता नव्हती. अजय तिला काय हवे काय नको या सर्व बाबी पुरवित होता. तिला एका राणी प्रमाणे ठेवत होता. पण विजया ला संसारात राजा राणी एवढंच पाहिजे होते. त्यांच्यासोबत आई राहत होती हे तिला वारंवार खटकत असे. छोट्या छोट्या गोष्टीवरून विजयाचे आणि अजयच्या आईचे वादविवाद होत असत. लग्न झाल्यावर तीन-चार महिने तेवढं सुखात गेले असतील त्या नंतर रोजच त्यांचे वाद होत असत आणि हे वाद ऐकून अजयच्या डोक्याला ताप चढत असे. आईला समजावून सांगितले तर बायकोला राग आणि बायकोला

समजावून सांगितले तर आई रागात असे. अजय एका कंपनीत चांगल्या पदावर काम करत होता आणि त्याला त्या नोकरीत महिन्याकाठी चाळीस पन्नास हजार रुपये पगार मिळत होता. अजय लहान असतांना म्हणजे सातव्या वर्गात शिकत असताना त्यांचे वडील रस्ते अपघातात वारले होते. तेंव्हापासून ते अजयला नोकरी लागेपर्यंत त्याच्या आईने अपार कष्ट सोसून त्याला शिकविले होते. मिळेल ते काम करत आणि पोटाला चिमटा देऊन तिने अजयला शिकविले. सुट्टीच्या दिवशी स्वतः अजय देखील आईसोबत कामाला जात असे. त्याला कोणते काम करणे कमीपणाचे वाटत नव्हते. कसाबसा दहावी पास झाल्यानंतर त्याने आय टी आय मध्ये प्रवेश घेतला. तेथील दोन वर्षाचे शिक्षण पूर्ण करून एका कंपनीत अर्ज केला होता. ज्यादिवशी कंपनीचा कॉल आला होता त्यादिवशी सर्वात जास्त आनंद आईला झाला होता. आता आईला घरकामात काही जास्त त्रास व्हायला नको म्हणून त्याने विजयाशी लग्न केलं. लग्नापूर्वीच अजयने स्पष्ट करून सांगितलं होतं की, आपणाला आईसोबत राहावं लागणार आहे. विजयाच्या घरच्यांनी बाकी सर्व बाबी चांगल्या होत्या म्हणून लगेच होकार दिला आणि धुमधडाक्यात त्यांचा लग्नसोहळा पार पडला.

सुरुवातीचे काही दिवस खूप मजेत आणि आनंदात गेले. सहा महिन्यांनी विजया गर्भवती आहे ही आनंदाची बातमी कळाली.

आईला तर खूप आनंद झाला. बापाच्याच रूपाने मुलगा घरात आला. आई त्या लहान बाळाची हवी तशी काळजी घेऊ लागली. मूल हळूहळू मोठे होत होते. तसे त्या दोघांचे भांडण देखील वाढू लागले होते. विजयाला सासूबाई सोबत राहणे त्रासदायक वाटत होते. वास्तविक तिच्यामुळे तिला एकप्रकारे फार मोठा आधार होता. मात्र ती वेगळ्याच विचारसरणीची होती. दररोज भांडण करून ते भांडण अजय पर्यंत घेऊन जात असे. अजय या रोजच्या कटकटीला पुरता कंटाळला होता. काय करावं हे त्याला सुचत नव्हतं. त्या दिवशी तर हद्दच झाली. विजयाने सासूबाईवर सरळ अंगठी चोरल्याचा आळ घातला होता. आई अंगठी तरी कशाला चोरेल ? तिला काय कमी आहे ? तूच कोठे तरी ठेवली असशील परत एकदा शोध असे अजय समजावून सांगू लागला पण विजया ऐकायला तयारच होईना. अजयच्या आईला या आरोपामूळे अस्वस्थपणा वाटत होता. तिने अंगठी घेतली नाही असे वारंवार सांगून देखील विजया ऐकायला तयार नव्हती. आईला एक मिनिट देखील तिथे राहावे असे वाटत नव्हते. जावं तरी कोठे जावे हा फार मोठा प्रश्न तिच्यासमोर पडला होता. तिने अजयला हुंदके देत देत म्हणाली," बेटा, आता या घरात राहणे मला शक्य नाही. मला जवळच्या कोणत्या तरी वृद्धाश्रमात नेऊन सोड. त्याठिकाणी राहीन मी काही दिवस सुखात." यावर अजयला काय बोलावे हेच सुचेना.

हे ऐकून विजया मनोमन सुखावून गेली होती. काही दिवस तरी हिचा पिच्छा सुटेल असे तिला मनोमन वाटू लागले होते. अजयने आईला आपल्या खोलीत जाण्यास सुचविले. आपण काय करत आहोत याची जाणीव अजयने सर्वप्रथम आपल्या मनाला दिली आणि विजयाला म्हणाला, " विजया पॅकिंग कर, आजपासून आपण इथे राहू शकणार नाही. काही दिवस तू माहेरी राहा. तोपर्यंत मी एखादी किरायाची खोली पाहतो. आपण तेथे राहू. हे आईचे घर आहे. तेंव्हा तिच्या घरातून तिला बाहेर करणे, हे माझ्या मनाला पटत नाही. तेंव्हा आपणच घराबाहेर जाणे योग्य राहील. तेंव्हा लवकर आटोप." असे म्हणून अजयने आईला आवाज दिला " आई, विजयाला माहेरी सोडून येतो. तिला माफ कर, तिला हे शेवटपर्यंत कळाले नाही की आईसोबत आम्ही राहतो. त्या वेडीला वाटत होतं, आई आमच्या सोबत राहते." एवढं बोलून अजय विजयाला घेऊन तिच्या माहेरी गेला आणि सोडून सायंकाळी परत आपल्या घरी आला. दुसऱ्या दिवशी सकाळी अजय नेहमीप्रमाणे उठला आणि तयार होऊन ऑफिसला गेला. सायंकाळी परत घरी आला, आईच्या हातचे जेवण करून शांत झोपी गेला. अजय दर विकेंडला विजया आणि मुलाला भेटायला जात असे आणि बाकीच्या दिवशी आई सोबत राहत असे. किरायाचे घर शोधतो हा एक त्याचा बहाणा होता. अजयच्या या अजब निर्णयाने विजया

चक्रावून गेली. काही महिने लोटले, तिच्या घरच्यांनी तिच्या या वागण्याचा विरोध केला. शेजारी पाजारी लोकं काही बाही बोलू लागले. अजय जवळ किरायाच्या घराविषयी काही गोष्ट काढलं की तो विषय टाळत असे. काही महिन्यांनंतर तिची चूक तिच्या लक्षात आली. सासूबाईवर चोरीचा खोटा आळ घातल्याचा तिला पश्चाताप होऊ लागला. एके दिवशी तिने आपले सारे सामान बांधली आणि थेट आपल्या घरी आली. सासूबाई बाहेर ओट्यावर बसल्या होत्या. विजयाला पाहून तिला आनंद झाला. विजयाने लगेच सासूबाईचे पाय धरले आणि " मी चुकले मला माफ करा " अशी विनवणी केली. सासूबाईने लगेच तिला गळ्याला घेतली, बाळाला कडेवर घेतली आणि दोघे घरात गेले. सायंकाळी अजय ऑफिसमधून आला. पाहतो तर काय विजया घरात दिसत होती. मुलगा खेळत होता. घरात अगदी शांत वातावरण होतं. विजयाने गरम चहाचा कप दिला. सायंकाळी सर्वांनी एकत्र बसून जेवण केलं आणि तेंव्हा अजय म्हणाला, आपण सर्वजण आईसोबत आनंदाने राहू या. विजयाने लगेच हसत हसत मानेने होकार दिला. त्यादिवशी अजयला खरी शांत आणि सुखाची झोप लागली.

# 07) मैत्रीचं झाड

जीप आणि मोटारसायकल यांच्यात झालेल्या अपघातात सुरेशचा जागेवरच मृत्यू दैनिकात एक छोटी बातमी वाचून संतोषचे मन सुन्न झाले. ऑफिसमध्ये खुर्चीवर बसल्या ठिकाणी छताच्या पंख्याकडे शून्य नजरेने पाहत विचार करत होता. सुरेश आणि संतोष खूप जिवलग मित्र, लंगोटीयार म्हटले तरी चालेल. पहिल्या वर्गापासून तर कॉलेजच्या शिक्षणापर्यंत ते दोघे एकाच वर्गात आणि एकाच बाकावर बसायचे. सुरेश दिसायला अगदी गोरा जरी नसेल तर जास्त काळा देखील नव्हता, डोक्यावर केस कमीच, उंची साधारणपणे साडेपाच फूट, पळण्यात खूपच चपळ, अभ्यासात हुशार नव्हता मात्र खेळाच्या बाबतीत त्याला कोणी चॅलेंज देऊ शकत नव्हते. कबड्डी, खोखो, धावणे यात तर तो पहिल्या क्रमांकावर राह्यचाच शिवाय त्याचा आवडता खेळ क्रिकेटमध्ये तो गोलंदाजी आणि फलंदाजी सुद्धा अव्वल असायचा. त्याचे घर म्हणजे एक झोपडीच. झोपडीला लागून एक मोठे वडाचे झाड होते. सुरेश आणि त्यांचा परिवार घरात कमी आणि त्या झाडाखाली जास्त वावरत असत. ते झाड म्हणजे त्यांचे दुसरे घरच होते. संपूर्ण

उन्हाळा त्याच झाडाखाली जात असे. दिवसा झोका खेळायचं आणि रात्रीच्या वेळी तेथेच झोपायचं. त्याच्या घरी ना लाईट होती ना टीव्ही. पण क्रिकेटचा सामना असला की मित्रांच्या घरी जाऊन क्रिकेट पाहत असे. खास करून संतोषच्या घरी जाऊन हमखास क्रिकेट बघायचं, त्यामुळे दोघेही संतोषच्या आई-बाबाच्या तोंडून शिव्या खायचे. दहाव्या वर्गात असतांना असेच ते दोघे सामना पाहत बसले त्यावेळी संतोषचे बाबा बाहेरून आले आणि त्यांना खूपच राग आला. " असेच जर मॅच बघत बसलात तर दहावीत लवकरच दिवे लावता तुम्ही ...!" एवढं बोलून ते मधल्या खोलीत गेले. संतोषने लगेच टीव्ही बंद केलं आणि सुरेषला घरी जाण्याचे खुणावले. दहावी संपेपर्यंत मॅच बघणार नाही असे वचन दिला आणि अभ्यासाला लागला. दहावीची परीक्षा संपली. तसं संतोष आणि सुरेश रोज सकाळी क्रिकेट खेळायला मैदानावर जात असत. त्यांच्यासोबत इतर ही त्यांचे मित्र असायाचे. त्यांची क्रिकेटची टीम खूप चांगली होती. त्यामुळे गल्लीगल्लीत त्यांच्या टीमची चर्चा होऊ लागली होती. दहावीचा निकाल लागला. त्यांची संपूर्ण टीम कमी जास्त फरकाने पास झाली. सर्वांनी मिळून एकाच कॉलेजात प्रवेश मिळविला. कॉलेजमधून एक क्रिकेटचा संघ निर्माण केला गेला. त्यात सुरेश, संतोष सह इतर दोघांचा नंबर लागला. संतोषच्या वडिलांनी स्पष्टपणे नकार दिल्यामुळे संतोष त्या

टीममधून बाहेर पडला पण सुरेश मात्र त्यात खेळत राहिला. त्याची बॉलिंग आणि बॅटिंग पाहून सारेच चकित होत असत. 18 वर्षाखालील संघासाठी त्याला पत्र आलं. पत्र वाचून त्याला खूप आनंद झाला.

" संतोष, मला परवा मुंबईला जायचं आहे, मात्र ......"

" मात्र काय यार, तुझ्याजवळ पैसे नाहीत ना मुंबईला जाण्यास ..."

"हो, यार कसे जाऊ ?"

"त्याची काही काळजी करू नको, होईल त्याची व्यवस्था, तू मुंबई ला जाण्याची तयारी कर"

सर्व मित्रांनी पैसा गोळा करून सुरेशला दिले. संघात त्याची निवड होणार सर्वांना खात्री होती. त्यादिवशी त्याने मुलाखत देण्यासाठी मुंबईला गेला होता. त्याचा खेळ खूप चांगला होता मात्र त्याच्या जागी दुसऱ्याच खेळाडूची निवड झाली. कारण सुरेशच्या पाठीमागे कोणी गॉडफ़ॉदर नव्हते, ना पैसा होता ना वशिला. तो अगदी उदास होऊन परत आपल्या गावी आला. संतोष खूप आनंदाने त्याच्याकडे जातो काही गोड बातमी ऐकायला मिळेल म्हणून पण निराश होतो. बारावीत शिकत असतांना देखील सुरेश अभ्यासात आणि वर्गात फार कमी आणि मैदानावर जास्त वेळ राहू

लागला. त्याला संघात स्थान मिळवायचे होते त्यासाठी जीवतोड मेहनत घेत होता. अपेक्षेप्रमाणे बारावीच्या परीक्षेत सुरेश नापास झाला. त्याचे बाकी सर्व मित्र बारावी पास झाले आणि सर्वत्र विखुरले गेले. सुरेश मात्र गल्ली बोळात क्रिकेट खेळणे चालूच ठेवले. गावोगावी कोणच्या वाढदिवसानिमित्त आयोजित खुले क्रिकेट सामन्यात सुरेश चमकू लागला. प्रत्येकजण सुरेशला आपल्या संघाकडून खेळण्यास ऑफर देऊ लागले. या खेळातून त्याला प्रसिद्धी सोबत पैसा देखील मिळू लागला. पेपरमधल्या अधूनमधून बातम्याने त्याच्या मित्राला देखील समाधान वाटत होते. काही वर्षे लोटली. दरम्यानच्या काळात त्याचे लग्न झाले. झोपडीतला सुरेश चांगल्या घरात राहू लागला. घराजवळच्या वडाचे झाड पाडून सुरेशने तेथे मोठे घर बांधले होते. त्याच्या हातात बऱ्यापैकी पैसे पडू लागले होते. क्रिकेट खेळण्यासोबत तो लहान मुलांना कोचिंग देखील देऊ लागला होता. त्यामुळे त्याची आर्थिक स्थिती सुधारत गेली. सध्या तो चांगला क्रिकेटर आणि कोच म्हणून प्रसिद्धीस आला होता. त्याला एक मुलगा आणि एक मुलगी असे दोन अपत्य होती. आपल्या लाडक्या सोनूचा वाढदिवस साजरा करण्यासाठी सुरेश गावातून केक आणण्यासाठी गेला. बराच वेळ झालं सुरेश आलं नाही म्हणून त्याला फोन केलं तर फोन ही लागत नव्हता. सुरेशच्या घरच्यांना खूप काळजी वाटत होती. रात्र होत

आली. मुलगी तयार होऊन वाट पाहून थकून गेली पण सुरेश काही घरी आले नव्हते. काही वेळानंतर फोनची घंटी वाजली

" हॅलो, हे सुरेशचे घर आहे का ?"

सुरेशच्या पत्नीने फोन उचलला, " होय हे सुरेशचेच घर आहे"

"आपण कोण बोलतय ? "

" मी सुरेशच्या पत्नी बोलत आहे, काय झालंय ?"

" मी पोलीस स्टेशनमधून बोलतोय, आपण लवकरात लवकर स्टेशनला यावं"

लागलीच ती पोलीस स्टेशनला पाहोचली. डोळयाने जे दृश्य पाहिले ते खूपच भयानक होते. सुरेशच्या मोटारसायकलचा अपघात झाला होता आणि त्याच्या डोक्यावरून जीपचे चाक गेल्यामुळे चेहरा पूर्ण चेंदामेंदा झाला होता. इतर काही बाबी वरून तो सुरेशच आहे याची खात्री पटली. स्टेशनमधले सर्व सोपस्कार पूर्ण करून डेडबॉडी घरी नेण्यात आले. वाढदिवसाच्या आनंदच्या जागी मृत्यूचा दुखवटा सर्वत्र पसरला होता. ती बातमी वाचल्याबरोबर संतोषने सर्व मित्रांना दुःखद बातमी कळविली. चार-पाच दिवसांनी सर्व मित्र एकत्र येऊन सुरेशच्या घरी भेट दिली. एक चांगला उमदा खेळाडू काळाच्या पडद्याआड गेल्याचं दुःख सर्वानाच होतं. सर्वांनी मिळून सुरेशच्या घरच्यांना जमेल तेवढं

आर्थिक हातभार दिलं. सुरेश गरीब होता पण कष्टाळू, स्वाभिमानी आणि होतकरू होता. याचा सर्व मित्रांना अभिमान देखील वाटत होता. सर्वांनी मिळून त्याचाच घरासमोर एक वडाचे झाड लावलं आणि त्याला नाव दिलं मैत्रीचं झाड. दरवर्षी ते सर्व मित्र त्या वडाच्या झाडाखाली एकत्र येतात आणि आपल्या जिवलग मित्राची आठवण काढतात. आज ते झाड सर्वाना मैत्रीची शिकवण देत असते.

# 08) सायकल गेली चोरीला

गण्या धावत पळत पोलीस स्टेशनमध्ये गेला आणि आपली सायकल चोरीला गेली याची तक्रार देऊ लागला. तिथे बसलेले हवालदार गण्याकडे लक्ष द्यायला तयार नव्हते, कारण ते आपल्या दुसऱ्या कामात व्यस्त होते. त्या हवालदारासमोर एक बाई बसली होती आणि ती रडत रडत तक्रार करीत होती. तिचा तक्रार लिहिणे झाल्यावर हवालदार गण्याकडे वळले आणि म्हणाले, हे सांग रे बाबा काय झालं ? यावर गण्या म्हणाला, साहेब माझी सायकल चोरीला गेली. कुठून गेली चोरीला साहेब, मेन रोड वरून मेन रोड म्हणजे नेमके कोठे ? देशी दारूचे दुकान ..... अच्छा ! तर तू दारू घ्यायला गेला होतास ? नाही हो, साहेब, तिथे बाजूला एक किराणा दुकान आहे तेथून सामान घ्यायचे होते. किती खोटे बोलतोस रे तू, किती वास येतेय तुझ्याजवळ. नाही हो साहेब, मी खरे सांगतो मी दारू पियाला गेलो नाही हो, मी गरीब माणूस आहे. माझ्याकडे दुसरा ड्रेस नाही. गेल्या एक महिन्यापासून एकच ड्रेस माझ्या अंगावर आहे. काही खोटे नाटे बोलू नको. दारूच्या नशेत तू सायकल कुठे ठेवलास नीट आठवण कर. साहेब, मी खरं सांगत

आहे, मी तेथेच सायकल ठेवलो. दुकानात सामान घेऊन परत येईपर्यंत सायकल गायब झाली. एका मिनिटात सायकल गायब झाली, बाप रे ! असे म्हणून हवालदार गण्याकडे संशयित नजरेने पाहू लागला. रागाने आपल्या शिपायाला आवाज देऊन अरे, याची चांगली तपासणी करा रे, यांच्याजवळ काही सापडते काय बघा ! गण्या पुरता घाबरून गेला भीक नको पण कुत्रा आवर अशी त्याची विचित्र अवस्था झाली. गण्या कळवळून म्हणू लागला. साहेब माझी सायकल चोरीला गेली त्याचे तक्रार लिहून घ्या अगोदर. माझी काय तपासणी करणार ? माझ्या जवळ काही नाही हो ! तरी देखील शिपायाने गण्याची पूर्ण तपासणी केली, त्याच्याजवळ काही निघाले नसल्याचे शिपायाने सांगितले. तरी देखील हवालदार तक्रार घ्यायला तयारच नव्हते. तेवढ्यात एका चोराला पकडून त्या हवालदारासमोर उपस्थित करण्यात आले. त्याला पकडून आणलेला शिपाई म्हणाला साहेब, हा मेन रोड वर एकाची सायकल चोरताना पकडला गेलाय. हे ऐकल्यावर गण्याला खूप आनंद झाला आणि म्हणाला कुठे चोरी करत होता. शिपाई म्हणाला मेन रोड वरील देशी दारूच्या दुकानासमोर हा सायकल चोरण्याचा प्रयत्न करीत होता तेंव्हाच काही लोकांनी त्याला पकडले. गण्याला आशेची एक किनार दिसून आली. हवालदाराने दंडुका दाखवून त्याच्याकडून सर्व माहिती काढली असता, नुकतेच

त्याने त्याच ठिकाणाहून चार-पाच सायकल चोरले असल्याची कबुली दिली. गण्याला आनंद वाटत होता कारण त्याला त्याची सायकल परत मिळणार होती. थोड्याच वेळात त्याने चोरलेल्या सायकली पोलीस स्टेशनमध्ये आणण्यात आले. त्यात गाण्यांची देखील सायकल होती. ती सायकल पाहताच तो हवालदार साहेबाना म्हणाला, साहेब हीच आहे माझी सायकल. तुमच्याजवळ पुरावा काय आहे ? ही सायकल तुमची आहे यासाठी. गण्या आत्ता विचार करू लागला. सायकलचे सर्व वर्णन केला।परंतु हवालदार मानण्यास तयार होईना. हवालदार म्हणाले, सायकलचे कागदपत्र आणा आणि सायकल घेऊन जा. गण्याला आत्ता प्रश्न पडला की, सायकलचे कागदपत्र कुठून आणावे. सायकल घेऊन आज 15-20 वर्षाचा काळ उलटला होता. सायकल विकत घेतलेले कागद आजपर्यंत जपून ठेवणे अशक्य होते. त्याने साहेबाला खूप विनंती केली. पण काही उपयोग झाला नाही. चोरीला गेलेली सायकल परत दिसायला लागली मात्र गण्याला काही परत मिळाली नाही. कदाचित सायकल ला इतर गाड्यासारखे क्रमांक देण्यात आले असते तर माझी सायकल मला परत मिळविता आली असती. गण्या हताश होऊन आपल्या घरी परत चालला असतांना त्याचा मित्र रशीद आणि जॉन तेथून जात

होते. त्यांनी गण्याला निराश पाहून विचारतात, " क्या हुआ गण्या ? "

" काही नाही रे, माझी सायकल चोरीला गेली. म्हणून पोलीस स्टेशनमध्ये गेलो. तिथे एका चोराने चोरलेल्या सायकली आणल्या होत्या त्यात माझी सायकल पण होती. त्या पोलिसांना माझी ती सायकल मला परत दे म्हणले तर देत नाहीत. "

यावर जॉन म्हणतो " वाय ? का देत नाहीत ?"

" उसके मा की, चल देखेगे, कैसे नाही देगा "

" नाही यार, तो सायकलची पावती आण म्हणतोय, कुठं आहे त्या सायकलची पावती, कोणाला माहीत"

" ऐसा है क्या .....हं ..... हं......"

रशीद थोडा वेळ विचार करतो आणि म्हणतो, " तेरे पास सौ रुपये है क्या ? मै अभी सायकल छुडा के लाता हुं "

" माझ्याजवळ कुठले शंभर रु. " तरी गण्या आपले खिसे तपासतो त्याला वीस रुपये मिळतात. जॉन जवळ तीस रुपये निघतात. रशीद जवळ पंधरा रु निघतात असे एकूण 65 रुपये होतात. काय करावं या विचारात ते परत पोलीस स्टेशनकडे जातात. रस्त्यात त्यांना फिरदोस नावाचा मित्र भेटतो. त्याला सर्व कहाणी सांगतात. त्यावर तो त्याच्याजवळ असलेले तीस रुपये

देतो. अश्याप्रकारे शंभराला फक्त पाचच रुपये कमी असतात. तरी ही ते पोलीसाजवळ जातात. गण्या दुरूनच त्याची सायकल दाखवितो. रशीद बोलायला खूप हुशार, तो थेट त्या पोलिसाजवळ जातो आणि सायकल चोरीला गेल्याचे सांगतो आणि गण्याची सायकल दाखवितो. त्याला देखील साहेब तेच उत्तर देतात, पावती आणून दाखव आणि सायकल घेऊन जा. यावर रशीद हळूच त्या पोलीस वाल्याच्या कानात काही तर कुजबुज करतो आणि खिशात हात घालून सर्व पैसा त्याच्या हातात देतो. गरीब पे दया करो साब असे जाता जाता म्हणतो. जा तेरा सायकल लेके जा. असे म्हणतात रशीद गण्याची सायकल काढतो आणि बाहेर पडणार इतक्यात तो पोलीसवाला आवाज देतो, अभे, इसमे पांच कम है, रुक जा. तो गण्याला सायकल देतो आणि बाहेर जाण्यास सांगतो आणि म्हणतो, हां, साब, अगली बार पांच जादा दे दुंगा साब. अच्छा ठीक है, जा. असे म्हणतात जॉन, रशीद आणि गण्या हसत खेळत घराकडे निघाले. जाता जाता गण्याने दोघांचे मनःपूर्वक आभार मानले.

# 09) रेल्वेतील शाळा

सकाळची वेळ होती आणि प्रत्येकजण आपापल्या घाईत होते. लहान मुलांची खेळणी घेऊन एक लहान मुलगा लोकल रेल्वेमध्ये घुसला. पाहता पाहता ती रेल्वे माणसांनी फुल्ल झाली. त्याच गर्दीचा फायदा घेण्यासाठी हा लहान मुलगा आपल्या विविध खेळणीसह आला होता. " दस मे एक, कौनसा भी लो दस मे एक " असं ओरडत तो डबाभर फिरत होता. डब्यातील लहान मुले त्याच्या खेळणीकडे पाहून आपल्या आई-बाबांकडे मागणी करीत होती. त्याच्या काही खेळणी विकल्या गेली. त्याच डब्यात तात्या गुरुजी प्रवास करीत होते. त्यांची शाळा रेल्वे मार्गावर 50-60 किमी अंतरावर वडगाव येथे होती. तात्या गुरुजी रोज सकाळी याच रेल्वेने प्रवास करीत असत. खेळणी विकणारा तो मुलगा देखील रोज याच रेल्वेत खेळणी विकायचा. पण त्यांची कधी भेट झाली नव्हती. कित्येक दिवसांनी त्यांची दोघांची गाठभेट झाली होती. एक खेळणी विकत घेण्याचा निमित्ताने तात्या गुरुजींनी त्याला जवळ बोलाविले. त्याचे कपडे मळके होते, गेल्या कित्येक दिवसात त्याने कदाचित अंघोळ देखील केले नसेल असे वाटत होते. आपल्या

अंगाचा वास येतो किंवा आपण घाण दिसतो त्याला त्याचे काही देणे घेणे नव्हते. गुरुजींनी त्याला जवळ बोलावून घेऊन विचारपूस केली आणि त्याला बोलतं केले.

" तुझं नाव काय आणि राहतोस कुठं ?"

" माझं नाव सुरेश आहे आणि मी वडगावला स्टेशनच्या बाजूला राहतो"

वडगावचं नाव एकूण तात्या गुरुजी थोडंसे दचकले कारण त्यांच्या शाळेचे गाव देखील तेच होते. मनात थोडं विचार करून गुरुजी पुढे म्हणाले, " तुझ्यासोबत कोण कोण आहेत ? " यावर त्याने उत्तर दिलं, " माझी आई, बाबा आणि तीन बहिणी आहेत, ते सर्व माझ्या पेक्षा लहान आहेत.

" आई बाबा काय काम करतात ? "

" ते सुद्धा माझ्यासारखे खेळणी विकतात पण दुसऱ्या गावात, ते रेल्वे मध्ये खेळणी विकत नाहीत."

" तुझं गाव वडगाव आहे तर तू येथून रामपूरहुन कसे काय चढला आहेस ? "

" वडगाव माझं गाव आहे मात्र आत्ता तिथं कोणीच नाही, आम्ही सर्वजण इथं रामपूर मध्ये स्टेशनच्या बाजूला राहतोत."

" शाळेला जातोस काय ? "

" नाही, फक्त एक दिवस शाळेत गेलो त्यानंतर कधीच गेलो नाही."

" तुला शाळेत जायला आवडेल का ?"

" होय आवडते, मला कागदावर लिहायला आवडतं, चित्रं काढायला आवडतं, पण बाबा शाळेला जाऊ नको असे म्हणतात."

" रोज किती रुपयांची खेळणी विकली जाते ? "

" शंभर एक रुपयांची विकली जाते, माझ्याजवळ कोणीच घेत नाही." हे ऐकून गुरुजी त्याला म्हणतात की

" उद्या काय कर तू अंघोळ कर, स्वच्छ कपडे टाक आणि खेळणी विकायला ये, बघ काय कमाल होईल ते."

गुरुजींचे बोलणे ऐकून सुरेश दुसऱ्या दिवशी अंघोळ करून स्वच्छ कपडे टाकून खेळणी घेऊन रेल्वेत चढला. तो आता चांगला दिसू लागला होता. नेहमीप्रमाणे लहान मुले खेळणीची मागणी करू लागले आणि पाहता पाहता त्याच्या जवळील सर्व खेळणी विकली गेली. त्याचं त्याला विश्वास बसत नव्हता. हे सर्व त्या गुरुजीची कृपा आहे, असे त्याला वाटू लागले. त्यांना भेटले पाहिजे म्हणून त्याच्या नजरा गुरुजींच्या शोधात इकडे तिकडे फिरत होते. सर्वत्र शोधाशोध केल्यावर गुरुजी एके ठिकाणी खिडकीला

बसलेले व बाहेरचे निसर्ग सौदर्य पाहण्यात मग्न असलेले त्याला दिसले. त्याचक्षणी तो धावत गुरुजी जवळ गेला आणि त्यांचे पाय धरले. गुरुजींनी खिडकीच्या बाहेरील लक्ष आपल्या पायाला धरलेल्या मुलांकडे वेधले. गुरुजींने सुद्धा त्याला ओळखले नाही एवढा तो स्वच्छ आणि सुंदर दिसत होता. सुरेशने आज त्याच्यासोबत घडलेली सारी कहाणी सांगितली आणि गुरुजीना धन्यवाद देऊ लागला. गुरुजींनी लगेच त्याला शाळा शिकण्याविषयी बोलले. पण त्याला आपल्या बापाची भीती वाटत होती. त्याच्या आत्मा त्याला सांगत होता की शाळा शिकावं पण .....

यावर गुरुजी म्हणाले, " तुझे सर्व खेळणी विकून झाले तर तू माझ्याजवळ येऊन बस, मी रेल्वेतच तुला शिकवतो. म्हणजे कोणालाही कळणार नाही. "

" मग चालेल काही हरकत नाही." सुरेशने आनंदाने होकार दिला. गुरुजी आपल्या पिशवीत पाटी-कलम आणि पुस्तक ठेवू लागले. गुरुजींनी त्याला येता जाता अक्षर आणि अंकाची ओळख करून दिली. त्याची बुद्धिमत्ता अफाट होती. अगदी थोड्याच दिवसात त्याला वाचन आणि लेखन येऊ लागले. तो रोजच पैशाचे व्यवहार करीत असल्यामुळे गणित शिकायला त्याला वेळ लागला

नाही. तो गुरुजींच्या सहवासात छान रमला आणि त्याला शाळा शिकावी असं वाटत होतं म्हणून त्याने गुरुजींना म्हणाला, " गुरुजी, माझ्या घरी या एकदा आणि माझ्या बाबाला समजावून सांगा ना ! मला शाळा शिकायचं, मला खूप काही लिहायचं" लगेच गुरुजींनी होकार दिला. एका रविवारी सकाळी सकाळी सुरेशच्या घरी गुरुजी गेले. गुरुजींना पाहताच सुरेशला खूप आनंद झाला. त्याच्या घरी बसायला ना खुर्ची होती ना पलंग, गुरुजी उभेच राहिले. तेवढ्यात सुरेशचे वडील आले. गुरुजींनी वाचण्यासाठी सुरेशला एक कागद दिला, सुरेश तो कागद खडखड वाचून दाखविला तेंव्हा त्यांच्या वडिलांच्या डोळ्यातून अश्रू गळू लागले. लगेच त्याने सुरेशला आपल्या गळयाला धरून घेतला आणि म्हणाला, " सूऱ्या, किती छान वाचतोस रे, कधी शिकला रं एवढं " गुरुजींनी त्याच्या वडिलांना सुरेशची सारी कहाणी सांगितली आणि म्हणाले " सुरेशला शाळेला जाऊ द्या. त्याचा आत्मा शाळा शिकण्यास आतुर आहे. तुम्ही जर त्याला शाळेत पाठविलं नाही तर त्याचा आत्मा तुम्हाला शाप पण देऊ शकते. " वडिलांनी लगेच विचार करून होकारार्थी मान हलविली. गुरुजींनी सुरेशचे नाव आपल्याच शाळेत वयानुरूप चौथ्या वर्गात घातले. ते दोघे रोज शाळेत रेल्वेने जात होते. सुरेश खेळणी विक्री करून वडगावाच्या शाळेत शिकू लागला. शाळा सुटल्यावर परत खेळणी विकत घरी परत येऊ

लागला. शाळेतून त्याला पुस्तक, गणवेष आणि जेवण तर शासन देत होतेच. तात्या गुरुजी त्याला दप्तर, वह्या, पेन, चप्पल देऊन दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले होते. दहावीचा निकाल लागला आणि सुरेश चांगले 50 टक्के गुण घेऊन उत्तीर्ण देखील झाला. त्याला शिक्षणाचे महत्व कळाल्यामुळे त्याने आपल्या तीनही बहिणीला शिक्षणासाठी गावातल्या शाळेत पाठविला. दिवसामागून दिवस सरत होते. काही वर्षानंतर तात्या गुरुजी सेवानिवृत्त झाले. रामपूर गावात त्यांचे घर, बंगला, सर्व काही होते. मात्र मुलगा मुंबईत नोकरी करत असल्यामुळे गेल्या पाच वर्षांपासून ते मुंबईला जाऊन राहिले होते. इकडे सुरेश रेल्वेच्या बाजूला राहून रेल्वेतल्या कर्मचाऱ्याशी दोस्ती केली होती. रेल्वेतील लहानसहान कामे करून तेथील अधिकाऱ्यांना तो खुश ठेवण्याचा प्रयत्न करत होता. त्याचा प्रामाणिकपणा आणि काम करण्याची वृत्ती पाहून रेल्वेच्या त्या अधिकाऱ्यांनी सुरेशला रेल्वेत नोकरी लावून दिली. तो रामपूरच्या रेल्वेस्टेशनमध्येच काम करू लागला. दिवाळीच्या सुट्ट्यात तात्या गुरुजी रामपूरला आले होते. ते वडगावला जाण्यासाठी सकाळी सकाळी रामपूर स्टेशनवर आले. रेल्वेला यायला अवकाश होता म्हणून ते एका खुर्चीवर बसले. त्यांच्या हातात पेपर होता. त्यात त्यांनी आपले डोळे खुपसले आणि वाचन करीत बसले. काही समजण्याच्या आत कोणी तरी त्यांचे पाय धरले

होते, पाहतात तर काय तो सुरेश होता. गुरुजी पेपर वाचत आहेत हे सुरेशने दुरून पाहिले आणि त्यांना ओळखले म्हणूनच सरळ तो धावत जाऊन त्यांचे पाय धरले. सुरेशला पाहताच गुरुजींना खूप आनंद झाला. ते म्हणाले, " अरे, सुरेश कसा आहेस ? कुठं राहतोस ? काय करतोस ? " एका दमात त्यांनी खूप सारे प्रश्न विचारले. सर्व प्रश्नांची उत्तरे देताना सुरेशला देखील खूप आनंद होत होता. सुरेशला रेल्वेत नोकरी लागली असल्याची बातमी त्यांच्या तोंडून ऐकतांना गुरुजीला खूप आनंद झाला तर सुरेश मनातल्या मनात म्हणू लागला माझ्या जीवनात तात्या गुरुजी आले नसते तर कदाचित आज मी जे काही आहे, ते राहिलो नसतो. असे म्हणत त्याने तात्या गुरुजींचे आशीर्वाद घेतले. एका शाळाबाह्य मुलांचे जीवन सुधारू शकलो याचे गुरुजींना मनोमन समाधान वाटत होते. रेल्वेमध्ये फावल्या वेळात सुरेशला दिलेले शिक्षणाचे धडे खूप मोठे कार्य करून गेले.

# 10) आठवण गावाची

वीस-पंचवीस वर्षानंतर आज शेखरला गावाकडे जाण्याचा योग आला. कारण ही तसेच होते. त्याचा जीवाचा जिवलग मित्र राजेशच्या मुलीचं लग्न होतं. राजेश आणि शेखर लहानपणापासून एकाच वर्गात शिकलेले. घराच्या बाजूला त्याचे घर. एकत्र खेळायचे, जेवायचे आणि एकत्रच राहायचे. त्यांच्या दोघांची मैत्री संपूर्ण गावाला माहीत होतं. वीस दिवसांपूर्वी राजेश स्वतः पत्रिका घेऊन शेखरच्या घरी गेला होता. लग्नाला सहकुटुंब सहपरिवार येण्याचं आमंत्रण देऊन गेला. म्हणून तो आपल्या परिवारासह गावाकडे जाण्यास भल्या पहाटे आपली गाडी घेऊन निघाला. गाडी ज्या वेगात जात होती त्याच वेगात त्याचं मन देखील गावात जाऊन पोहोचलं होतं. लहानपणी असलेलं गाव आज तसंच असेल काय ? काय काय बदल झाला असेल या विचारांच्या तंद्रीत तो गाडी चालवू लागला. शेखरची मुलं देखील गावी जायला मिळतंय म्हणून आनंदी होती. आजूबाजूला पळणारी झाडे आणि गावं पाहून शेखरचा लहान मुलगा आनंदाने टाळ्या वाजवत होता. गावात आता शेखरचं काही शिल्लक राहिलं नव्हतं. आई-बाबा

देवाघरी गेल्यानंतर तो घर आणि शेत विकून दूर शहरात राहायला गेला होता. त्यामुळे त्याचं आणि गावाचं नाळ पूर्णपणे तुटला होता. मात्र राजेशच्या आमंत्रणामुळे आज गावी जाण्याचा योग आला. चार तासाच्या प्रवासानंतर तो गावी पोहोचला. त्याची गाडी येतांना पाहून राजेशला देखील खूप आनंद झाला. हातपाय धुवून फ्रेश झाल्यावर चहापाणी घेतलं आणि शेखर गावात फेरफटका मारावं म्हणून बाहेर पडला.

लहानपणी ज्या गावात ज्या ठिकाणी खूप दंगा मस्ती, लंपडाव, क्रिकेट असे खेळ खेळायचा त्या जागा आज लुप्त झाल्या होत्या. शाळेचे मैदान बंदिस्त झाले होते. गावातील खुले मैदान म्हणजे शाळेचे मैदान पण आज शाळा सुरू असेल तरच शाळेत प्रवेश करता येतो कारण चहूबाजूनी शाळेला बंदीस्त केले होते. शाळा पहिल्यासारखी राहिली नव्हती. दोनच खोल्याची शाळा आज सात-आठ खोल्यांची झाली होती. विविध प्रकारच्या चित्रांनी बोलकी झाली होती. सुट्टीच्या दिवशी शांत वाटणारी शाळा इतर दिवशी मुलांच्या आवाजाने गलबलून जायची. हा बदल झाला असला तरी शेखरला ती शाळा पाहून खूप आनंद झाला. शाळेच्या काही अंतरावर एक मोठे चिंचेचे झाड होते. त्याठिकाणी एकट्याला जाणे तेंव्हा खूप भीतीदायक वाटायचे. मुलं एकटे तिकडे कधीच जायचे नाहीत. चिंचा पाडायला दोघे तिघे मिळून जायचे. तसा

शेखरचा नेम मात्र लय भारी. ज्याच्यावर नेम धरला ते बरोबर खाली पाडायचा. थोडेफार चिंचा घेऊन गुपचूप शाळेत येऊन बसायचे. गुपचूप अधून मधून चिंचा खात बसायचे. आज मात्र त्या चिंचेच्या झाडाचे भय वाटत नाही. कारण ते चिंचेचे झाड गावाचे बसस्थानक बनले होते. पूर्वी त्या झाडाजवळ चिटपाखरू दिसत नव्हते. पण आज त्या झाडाखाली अनेक रिकामटेकडे माणसं दिवसभर गप्पा मारत बसलेले दिसत होते. त्याच्या आजूबाजूला काही दुकानं आणि हॉटेल चालू झाली होती. पूर्वी गावात चहा फक्त घरी प्यायला मिळत असे. इतर कोणतेच वस्तू मिळत नव्हते. पण आज तिथे वेगवेगळी दुकानं आणि हॉटेल चालू झाली होती. बरेच लोकं त्याचा आस्वाद पण घेत होती. पूर्वी गावात सकाळ दुपार आणि सायंकाळ लाल रंगाची बस धुरळा उडवत यायची. पण सध्या गावात बसच येत नाही मात्र शहरात जाण्यास भरपूर ऑटो थांबलेले असतात. लोकं आता त्याच्यानेच दाटीवाटीने प्रवास करत असतात असे तेथील लोकांनी शेखरला सांगितले. गावाच्या पश्चिमेला एक मोठा तलाव होता. त्यात नेहमी पाणी भरून असायचे, गावातील सर्वांचे कपडे धोबी लोकं त्या ठिकाणी आणून धुवायचे. संपूर्ण तलाव विविध रंगाच्या कपड्याने रंगून जायचे. पण आज या तलावात भरपूर पाणी आहे मात्र कोणीही त्याठिकाणी कपडे धुवायला येत नव्हते, त्यामुळे तलाव विविध रंगी दिसत

नव्हते. लोकं आपापल्या घरी कपडे धुवून घेत आहेत म्हणून धोब्याची काम देखील कमी झाले आहे. तलावाच्या आजूबाजूला पाच सहा बोरीचे झाडं होते. त्यातील एका झाडाचे बोर खूपच गोड होते. त्याला खारका बोर असे नाव होतं. ते एका मुस्लीम व्यक्तीच्या मालकीचे होते. ती म्हातारी बाई सकाळपासून सायंकाळपर्यंत त्या झाडाखाली बसून राहायची. पाच पैश्याला एक डबा बोर द्यायची. कधी तरी ती झाडाखाली नसताना शेखर आणि त्याचे मित्र चोरून त्या झाडाची बोर आणायचे. पण हे जर त्या म्हातारीला कळाले की, ती घरी येऊन शेखरच्या आईला सांगायची, खूप भांडायची मग काय शेखरची आणि रमेशची त्यादिवशी खिचडीच व्हायची. त्याच झाडाच्या बाजूला जांभाचे झाड होते. ते ही अगदी गोड होते. त्याचे मुलांना अप्रूप वाटायचे. शाळेत असतांना पैसे जवळ नसल्यामुळे मनात असून देखील शेखरला खायला मिळायचे नाही. हे सर्व त्याला जसेच्या तसे दिसू लागले होते. मात्र आज त्या जागेवर कोणतेच झाड शिल्लक नव्हते. सर्व झाडे तोडण्यात आली होती आणि त्याठिकाणी काही लोकांची झोपडी झाल्याचे दिसू लागले होते. खरोखरच फळांची झाडे तोडणे योग्य आहे काय ? याचा विचार करून शेखरचे मन भरून आले होते. शाळेला लागूनच एक आंब्याचे ही झाड होते. त्या झाडाचे आंबे देखील चोरून खाण्यात शेखरला खूप मजा यायची. रविवारच्या दिवशी

शेखर, रमेश, गणेश हे सारे मित्र तळयात क्रिकेट खेळायला जायचे. दुपारी ऊन होईपर्यंत तहानभूक विसरून खेळायचे, खेळून खेळून परत घरी आल्यावर कधी कधी शिव्या भेटायचं पण क्रिकेट खेळणे त्यांनी सोडले नाही. आज त्या तलावात सर्वत्र मोठं मोठे खड्डे दिसत होते, ते मैदान कुठेच दृष्टीस पडत नव्हते. आजच्या मुलाना खेळायला जागाच नाही, आज मुलं पूर्वीचे कोणतेच खेळ खेळत नाहीत, हे पाहून शेखरला खूप दुःख वाटले. आज मुलं घरातच बसून एकतर टीव्ही पाहतात किंवा मोबाईलवर गेम खेळतात असे एका युवकाने शेखरला सांगितल्यावर तो खूप चिंतीत झाला. शाळेच्या परिसरात असे अनेक फळांचे झाडं होते तर शेखरच्या घराच्या पाठीमागे सीताफळाचे झाड होते. सीताफळाची पिवळी फुले लागल्यापासून शेखर त्याची काळजी घेत असे. दुपारच्या सुट्टीत एकदा घरी जाऊन झाडाखाली उभे राहून सर्व सीताफळ एकदा निरखून पाहत असे. डोळे उघडलेले सीताफळ तोडून घरात एखाद्या मडक्यात ठेवले जायचे. रात्रीच्या जेवणानंतर त्या सीताफळाचे सर्वामध्ये वाटणी करून खायले जायचे. शेखर रडून रडून एखादे सीताफळ मिळवित असे. मात्र ज्याने ते घर विकत घेतले त्याने ते सीताफळाचे झाड तोडले होते. त्याच्याच बाजूला एक चाफ्याचे झाड. ती पिवळी फुले पाहिली की मन मोहून जायचे. देवाला फुले पाहिजे म्हटले की शेखर झाडावर चढायचं थोडंसं झाड

हलविले की खूप फुलं खाली पडायचे. देवासाठी काही फुलांचे हार केल्या जायचं तर काही फुलं तसेच खुले ठेवले जायचे. पण आज सीताफळाचे झाड नाही ना चाफ्याचे झाड. शेखरच्या घराच्या बाजूला एक विहीर होती. त्या विहिरीचे पाणी गावातील सर्व लोकं पिण्यासाठी घेऊन जात. भल्या पहाटे उठून लोकं त्या विहिरीवर गर्दी करायचे. सकाळी सकाळी बादलीचा आणि बायकांच्या बोलण्याचा आवाज कानावर पडायचं. पावसाळ्याच्या दिवसांत तर हौदातून पाणी घ्यावे तसं त्या विहिरीतून पाणी घेतल्या जायचं. ती विहीर देखील आज नामशेष झाली आहे. सकाळी सकाळी येणारा तो पोहऱ्याचा आवाज देखील लुप्त झालाय. आज सर्वांच्या घरी सार्वजनिक नळाद्वारे पाणी येत आहे. त्यामुळे पाणी भरण्याचे ही कोणाला अनुभव मिळत नाही. कष्टच कमी झाले म्हणून आज लोकांना विविध प्रकारच्या रोगांना बळी पडावे लागत आहे, असे चित्र शेखरला दिसू लागले होते. पर्यावरणाशी या लोकांनी कट्टी केली म्हणून तर गाव पूर्ण वेगळ्याच समस्यांनी त्रस्त दिसत होतं. बदल झाला नाही तर गावाकडे जाणारा रस्ता, त्यात मात्र काही बदल झाक नाही पूर्वी जसा खाचखळग्याचा होता तसाच आहे. गावात येताना शेखरला गाडी चालविताना त्याचा अनुभव आला होता. गावातले रस्ते सिंमेंटचे आणि नाल्याही सिमेंटचे बांधले गेले होते. त्यामुळे गावातून दुचाकी कोठे ही फिरविता येऊ शकत होती.

अगोदर ज्या गल्ली बोळात सायकल चालविणे जिकरीचे होते. तेथे गाडी देखील चालविता येऊ शकत होती. गावातल्या अनेक जागा नामशेष झाल्या होत्या मात्र शेखरच्या मनात त्या आठवणी आज ही कायम होत्या. लग्न संपल्यावर जेवण करून राजेशचा निरोप घेतला आणि येतांना जो उत्साह होता तो उत्साह परत जातांना त्याच्या चेहऱ्यावर मुळीच नव्हता. गावाकडच्या आठवणी मनात साठवून खिन्न मनाने शहराच्या दिशेने गाडी पळवू लागला.

# 11) परतफेड

राम आणि श्याम लहानपणापासून एकाच वर्गात शिकत होते. पण राम एका मोठ्या कंपनीत चांगल्या पगारावर काम करू लागला तर श्याम मात्र कोणतेही काम न करता वाया गेला. आज खूप दिवसांनी राम आपल्या गावी आला होता आणि श्यामला भेटण्यासाठी त्याच्या घरी गेला. त्याची ती अवस्था पाहून राम खूपच दुःखी झाला होता. घरात तो पलंगावर आडवा पडला होता, त्याला पलंगावरून धड उठता देखील येत नव्हते. त्याला कॅन्सर झाला होता आणि दिवसागणिक त्याची शक्ती कमी कमी होत चालली होती. घरात त्याची बायको आणि दोन लेकरं होती मात्र कोणाच्याही चेहऱ्यावर कसलाही उत्साह दिसत नव्हता. लहानपणी शाळा शिकतांना जसे घर होते आजही तसेच होते. ज्या जागेवर दोघे मिळून खेळले होते, अभ्यास केला होता आणि एकत्र जेवण देखील केले होते ती जागा पाहून राम भूतकाळात गेला. दुसरीच्या वर्गात असतांना घडलेली एक घटना त्याला आठवली. बाई वर्गात आले आणि हजेरी घेतली. रामची हजेरी झाली की श्यामचे नाव येते. त्यादिवशी श्याम शाळेत आला नव्हता. लगेच

बाईने रामला श्यामच्या घरी जाऊन बोलावून येण्यास सांगितले. तसा राम त्याच्या घरी गेला. तेंव्हा श्याम आपल्या घरीच खेळत होता. रामला पाहून तो रागात आला आणि तू मला घेऊन जाण्यास का आलास ? म्हणून हातात जे येईल त्याच्याने रामकडे फेकू लागला. तोंडात आले ते अपशब्द बोलू लागला. त्याचे आई-वडील तिथेच होते मात्र त्यांनी त्याला काहीच म्हणत नव्हते. पण राम काही एक न ऐकता त्याला शाळेत घेऊन गेला. शाळेत गेल्यावर बाईने श्यामला शिक्षा केली आणि यानंतर घरी राहिल्यास जास्त मोठी शिक्षा करण्यात येईल अशी तंबी दिली. हे सर्व राममुळे झालं म्हणून त्याच्या मनात रामविषयी कटुता निर्माण झालं. त्यादिवशी पासून श्याम दूर दूर राहू लागला. त्याच्याशी कट्टी केलं. राम मात्र सर्व काही विसरून त्याच्या सोबत राहण्याचा प्रयत्न करत असे. राम हा शांत स्वभावाचा, मनमिळाऊ आणि अभ्यासात हुशार होता. त्यामुळे तो बाईचा लाडका विद्यार्थी होता. रामला चांगला धडा शिकवायचं असे श्यामच्या मनात चाललं होतं. तो संधीचं फक्त वाटच पाहत बसला होता. तशी एक संधी त्याला मिळाली. एके दिवशी राम शाळेत आला नव्हता. लगेच बाईने रामला बोलावून आणण्यासाठी श्यामला पाठविले. आज रामला खूप शिक्षा करायला लावू या विचारात तो रामच्या घरी पोहोचला. घराच्या बाहेर कोणीही दिसत नव्हते. त्याने बाहेरूनच राम..... राम

.......असा आवाज दिला. त्याच्या आईने " कोण आहे ?" असे म्हटल्यावर श्यामने आपले नाव सांगितले. "श्याम का ये मध्ये." श्याम घरात गेला. घर कसलं ते तर एक झोपडी होती. राम जमिनीवर झोपला होता आणि त्याची आई त्याच्या बाजूला बसली होती. रामला खूप ताप भरलं होतं हे त्याच्या घरी गेल्यावर कळाले. "तो आज शाळेत येऊ शकणार नाही " असे त्याच्या आईने त्याला सांगितले. श्यामच्या मनात वेगळाच विचार होता मात्र आजारी रामला पाहून तो सारे विसरला. लवकर बरा हो आणि शाळेला ये असं बोलून तो परत शाळेला गेला. बाईला खरे कारण सांगितला आणि आपल्या जागेवर जाऊन बसला. आज शाळेत राम आला नाही तर त्याला देखील करमत नव्हते. राम आठवडाभर शाळेत आलाच नाही. त्याचा आजार काही बरा होत नव्हता. त्याचे वडील तो लहान असतांनाच वारले होते तर त्याची आई मोलमजुरी करून जगत होती त्यामुळे रामला मोठ्या दवाखान्यात दाखविण्यासाठी त्यांच्याजवळ पैसा ही नव्हता. श्यामला आता रामची खूपच काळजी वाटू लागली. श्यामचे वडील श्रीमंत नव्हते पण त्यांच्याजवळ बऱ्यापैकी पैसा होता. श्यामने अगदी सहज आपल्या बाबांना म्हणाला, "बाबा तुम्ही रामला मदत करू शकता का ?"

" काय झालं रामला ?"

" तो आजारी आहे, आठ दिवस झाले तो शाळेत आला नाही"

" काय झालंय ?"

" माहीत नाही मला, पण त्याचा ताप उतरत नाही, असे त्याची आई म्हणाली. मोठ्या दवाखान्यात जायला पैसे नाहीत असे ही बोलली"

" असं आहे का ? काय मदत करू मग ...!"

" त्याला मोठ्या दवाखान्यात दाखविण्यासाठी थोडे पैसे द्या ...."

श्यामच्या बाबाला श्यामचे कौतुक वाटले. त्यांनी लगेच होकार दिला. दुसऱ्या दिवशी श्यामच्या बाबानी रामला आपल्या गाडीवर बसवून शहरातल्या मोठ्या दवाखान्यात नेले. तेथे सर्व तपासणी झाली आणि डॉक्टरने औषध गोळया दिल्या ते घेऊन सायंकाळी घरी आले. त्या औषध गोळयामुळे रामची तब्येतीत हळूहळू सुधारणा झाली. तब्बल वीस दिवसांनी तो शाळेत आला होता. तापेमुळे राम खूपच बारीक दिसत होता. मात्र त्यादिवशी दवाखान्यात गेलं नसतं तर कदाचित काही तरी विपरीत घडलं असतं असे डॉक्टरांनी बोलले होते. रामच्या आईने श्याम आणि त्यांच्या वडिलांचे खूप आभार मानले. या घटनेमूळे राम आणि श्यामची मैत्री गाढ झाली. आत्ता राम जास्तीत जास्त वेळ श्यामच्या

घरी राहू लागला. राम हुशार होता, त्याच्या संगतीने श्याम मध्ये सुधारणा होईल म्हणून श्यामचे बाबा काही म्हणत नव्हते. रामची अभ्यासातील प्रगती चांगली होती मात्र श्यामची तेवढी नव्हती. शाळेत त्याचे इतर मित्र त्याला वेगवेगळी कामे करायला लावायची. त्यामुळे तो अभ्यासापासून दूर जाऊ लागला. हायस्कुलचे वर्ग शिकण्यासाठी ते दोघे शहरात गेले. श्याम एक खोली घेऊन राहू लागला तर राम हॉस्टेलमध्ये राहू लागला. दोघे एकाच शाळेत आणि एकाच बाकावर बसायचे. श्याम सकाळच्या सत्रात राहायचा आणि दुपारच्या सत्रात गायब राहायचा. रोज दुपारी तो कधी पिक्चर पाहायला जायचा तर कधी गावात फिरत राहायचा. त्याला वाईट मित्रांची संगत लागली होती. त्याचे काही मित्र सिगारेट ओढत होते, तर काही तंबाखू, गुटखा खात होते. अभ्यासात मात्र सारेच शून्य होते. तीन वर्षांच्या काळात श्यामच्या वडिलांनी कधी ही त्याच्याकडे लक्ष दिले नाही. दहावीचा निकाल लागला आणि श्याम सर्वच विषयात नापास झाला तर राम चांगल्या मार्कांनी पास झाला होता. राम शिकण्यासाठी तेथेच शहरात राहिला तर श्याम आपल्या गावी परत गेला. गावी गेल्यावर श्यामला दुसरे काही कामच नव्हते. सिगारेट ओढत आणि तंबाखू खात रिकामटेकडा फिरत राहायचा. त्याचे हे व्यसन वाढतच गेले. काही वर्षांनंतर त्याचे लग्न झाले. रामला लग्नाची पत्रिका द्यायची

होती पण तो सध्या कोठे आहे हे कोणालाच माहीत नव्हतं. त्यामुळे श्यामच्या लग्नाला त्याचा जिवलग मित्र उपस्थित नव्हता. राम चांगला शिकून पुण्याच्या एका कंपनीत नोकरी करू लागला होता. त्यात त्याला चांगला पगार देखील मिळत होता. तो आणि त्याची आई सुखात होते. स्वतःचे घर झाल्याशिवाय लग्न करायचे नाही म्हणून तो अजून ही लग्न केलेला नव्हता. एके दिवशी सहज फेसबुक चाळत असतांना त्यांच्याच एका मित्राने पोस्ट केली. श्याम कॅन्सरच्या आजाराने त्रस्त आहे, कोणी तरी समोर येऊन मदत करावे. ती पोस्ट वाचल्यापासून राम अस्वस्थ होता. म्हणून त्याला एकदा तरी भेटायला जावं म्हणून आज तो गावी आला होता. त्याची अवस्था खूपच बिकट झाली होती. त्याला पाहवले नाही. लगेच त्याने श्यामच्या बायकोला म्हणाला, "वहिनी, आपण श्यामला घेऊन पुण्याच्या दवाखान्यात जाऊ या."

" पण माझ्याकडे तेवढे पैसे नाहीत, दवाखान्यात दाखवायला."

" तुम्ही नका काळजी करू, मी आहे ना ..!"

लगेच सर्वांनी पुण्याला जाण्यास निघाले. पुण्यातील सर्वात मोठ्या कॅन्सरच्या दवाखान्यात श्यामला भरती करण्यात आले. डॉक्टरांनी सर्व तपासण्या करून दहा दिवस दवाखान्यात ठेवण्यास

सांगितले. रामच्या आईला ही बातमी कळाली तसं एक दिवस ती देखील श्यामला भेटायला आली. दहा दिवसांनी श्यामच्या तब्येतीमध्ये हळूहळू सुधारणा होत गेली. दवाखान्यात भरती होतांना श्यामला चालता देखील येत नव्हते मात्र आज तो पलंगावरून स्वतः उठू शकत होता. डॉक्टरांनी दहा दिवसांनी सुट्टी दिली आणि सोबत औषध गोळया ही दिल्या. रामने दवाखाण्याचा सर्व खर्च भरला. श्याम कॅन्सरच्या रोगापासून आणि व्यसनापासून देखील मुक्त झाला होता. श्याम मनोमनी रामचे खूप आभार मानले. जेवढे काही शिल्लक जमापुंजी होती ते सारे श्यामच्या उपचारासाठी खर्च केले. पैसे खर्च झाले यापेक्षा जिवलग मित्राला वाचवून उपकाराची परतफेड करता आली त्यातच रामला खूप आनंद झाला होता.

# 12) ब्लू व्हेल

अभय आणि अनिता एका मोठ्या कंपनीमध्ये जॉब करत होते. त्यांना अभिमन्यू नावाचा एकुलता एक मुलगा होता. दोघे ही इंजिनियर होते आणि दुसरे अपत्य नको म्हणून त्यांनी एकच अपत्यावर ऑपरेशन देखील करवून घेतले होते. अगदी सुरुवातीच्या काळात त्या दोघांना अनेक संकटाना तोंड द्यावे लागले होते. दोघांच्या लग्नाला घरातून विरोध असल्यामुळे त्यांनी कोर्टात लग्न लावून घेतले होते आणि मुंबईमध्ये एका प्लॅटमध्ये राहत होते. त्यामुळे अभय आणि अनिता यांच्या घरच्यांनी देखील त्यांना भेट देत नव्हते. ते दोघे नोकरी करत करत घर सांभाळत होते. दोन वर्षानंतर त्यांच्या जीवनात अभिमन्यूचा प्रवेश झाला. तेंव्हा दोघांनाही खूप आनंद झाला. ही बातमी ऐकून तरी आई-बाबा भेटायला येतील असा त्यांना विश्वास होता मात्र कोणी ही भेटायला आले नाहीत, तेंव्हा त्यांना खूप दुःख वाटले. सहा महिन्यांच्या प्रसूतीची सुट्टी संपल्यावर अनिता परत जॉब करण्याचा विचार करत होती आणि अभय त्यास विरोध करत होता. मात्र अनिता काही ही ऐकण्याच्या मनस्थितीमध्ये नव्हती. लहान अभिमन्यूला सोडून कसे

जायचे ? हा फार मोठा प्रश्न त्यांच्यासमोर पडला होता. प्रत्येक समस्यांचे निराकरण होतेच तसे या प्रश्नाचे देखील निराकरण झाले. जवळच असलेलं पाळणाघर त्यांना पर्याय योग्य वाटला. दोघांनाही निर्णय घेतला की अभिमन्यूला जवळच्या पाळणाघरात ठेवायचे. अभिमन्यूला पाळणा घरात ठेवून दोघेही नोकरीला जाऊ लागले. अभिमन्यूला रविवार सुट्टीच्या दिवशी फक्त आई-बाबा सोबत मिळू लागली होती. अभिमन्यू आता तीन वर्षांचा झाला होता. त्याला पाळणाघरातुन प्ले ग्रुपच्या शाळेत टाकण्यात आले. तो दिवसभर त्या शाळेत खेळू लागला, जेवू लागला आणि थोडा वेळ झोप सुद्धा घेऊ लागला. त्यांचे रुटीन असेच चालू होते. आई-बाबापासून दूर राहणारा अभिमन्यू हळूहळू आक्रमक होऊ लागला. सुट्टीच्या दिवशी आई-बाबा सोबत कमी बोलू लागला. जसे जसे दिवस सरत होते तसेतसे अभिमन्यू अजून जास्त आक्रमक होऊ लागला. ते दोघे त्याचे खूप लाड करत होते. अनिता थोडेसे लवकर म्हणजे सायंकाळी सातला घरी येत होती तर अभयला घरी यायला रात्रीचे दहा वाजत होते. अभिमन्यू पहिल्या वर्गात प्रवेश करतेवेळी त्यांचे स्वतःचे प्लॅट झाले होते, घरासमोर आलिशान चारचाकी गाडी झाली आणि घरकामासाठी एक दाई देखील होती. अभिमन्यूची सर्व देखभाल आता घरीच केल्या जाऊ लागली. त्याला शाळेला जाण्यासाठी व येण्यासाठी स्कुलबस होती. दाई त्याला तयार करून

शाळेत पाठवित होती आणि शाळेतून घरी आल्यावर तीच दाई त्याची काळजी घेऊ लागली. त्यामुळे अनिता आता रात्री उशिरा येऊ लागली. अभय देखील रात्री दहाच्या पुढे येऊ लागला. पुढे पुढे अभिमन्यूला हक्काचा रविवार देखील मिळेनासे झाले. महिन्यातून एखादा रविवार अभय आणि अनिता घरात दिसत होते. त्याला एकट्याला घर खायला येत होते. शाळा, घर, अभ्यास आणि टीव्ही याच सान्निध्यात अभिमन्यू पहिली पासून दहाव्या वर्गापर्यंत पोहोचला होता. अभिमन्यू तसा हुशार होता. दहावीमध्ये त्याला चांगले मार्क मिळाले होते. त्याला आता कोणत्या दाईची गरज उरली नव्हती. मागेल तेवढं पॉकेटमनी आणि हवी ती वस्तू मागितल्याबरोबर त्याला मिळत होती. बाबांनी वचन दिल्याप्रमाणे दहावीत चांगले गुण घेतल्यास स्कुटी आणि मोबाईल अभिमन्यूला मिळाले. त्या दिवशी तो खूपच आनंदात होता. त्याचे कॉलेजचे दिवस सुरू झाले. कॉलेजला स्कुटीवर जाणे आणि रिकामा वेळ मोबाईलमध्ये घालविणे हे अभिमन्यूला बऱ्यापैकी जमू लागले होते. अबोल असलेला अभिमन्यू कोणालाही जास्त बोलत नव्हता. त्या घरात तीन सजीव असून देखील कधी एकत्र बसण्याचा योग आला नव्हता. त्यांना कोणत्याच गोष्टीची कमतरता नव्हती, उणीव होती ती म्हणजे प्रेमाच्या मायेची. दिवसेंदिवस अभिमन्यू मोबाईलमध्ये जास्त व्यस्त राहू लागला. फेसबुक, व्हाट्सअप्प,

इन्स्टाग्राम यासारख्या अँपने त्याला अक्षरशः वेडे करून टाकलं होतं. यादरम्यान एके दिवशी अभय आणि अनिता यांनी अभिमन्यूला मानसोपचार डॉक्टरकडे घेऊन गेले. त्यावेळी डॉक्टरांनी अभिमन्यूची काळजी घेण्याचे सांगितले होते. मात्र थोड्याच दिवसांत ते सारे विसरले होते. त्यातच त्याला कोणी तरी ब्लु व्हेल नावाच्या अँपची लिंक त्याच्या मोबाईलवर पाठविली होती. अभिमन्यूने लगेच ते अँप आपल्या मोबाईलमध्ये डाउनलोड करून घेतला आणि दिवसरात्र त्याच खेळात आपले डोके खुपसून राहू लागला. अभय आणि अनिताला याची भनक देखील नव्हती. त्याचे कॉलेजला जाणे देखील हळूहळू कमी झाले. त्याच्याकडे दोघांनाही वेळ नव्हता. आपल्या खोलीतच तो बंद राहू लागला. अभय आणि अनिता रात्री उशिरा येत होते. तोपर्यंत तो खाऊन झोपी जाऊ लागला. त्या दिवशी रविवारची सुट्टी होती. अभय आणि अनिता यांनी बाहेर जाण्याचा प्लॅन केले होते मात्र अभिमन्यू बाहेर येण्यास नकार दिला. तसे ते दोघेच बाहेर गेले. बाहेर फिरून बऱ्याच वेळानंतर ते परत आले. तर त्यांच्या घरासमोर लोकांची खूप गर्दी जमा झाली होती. गर्दीतुन रस्ता काढत अभय आणि अनिता पुढे जाऊ लागले. समोर गेल्यावर जे दृश्य दिसलं ते पाहून दोघेही थंडगार झाले. जमिनीवर एकाचा मृतदेह पडलेला होता, डोक्याला जबर मार लागलेला होता आणि रक्त वाहू लागला होता.

तो दुसरा तिसरा कोणी नसून अभिमन्यूच होता. दोघांचेही काळीज पाणी पाणी झालं. लगेच अंब्युलन्स बोलावून अभिमन्यूला दवाखान्यात नेले. डॉक्टरांनी तपासणी करून अभिमन्यू मृत झाल्याचं सांगितलं. त्याबरोबर अनिताने एकच टाहो फोडला. अभयच्या तोंडातून तर शब्द ही बाहेर पडत नव्हते. काही वेळात तेथे पोलीस आले. त्यांनी सर्व चौकशी केली. अभिमन्यू राहत्या प्लॅटवरील माळावरून उडी मारली होती. तो असा का केला याचा तपास पोलीस लावण्याचा प्रयत्न करीत होती. " अभिमन्यूकडे मोबाईल होता का ? " पोलिसांनी विचारल्यावर त्याचा मोबाईल पोलिसांना देण्यात आले. त्याचा मोबाईल चेक केल्यावर कळाले की, अभिमन्यू ब्लु व्हेल गेम खेळत होता आणि आज शेवटच्या गेमवर आला होता. म्हणूनच आज तो अभय आणि अनिताच्या सोबत बाहेर फिरायला जाणे टाळले होते. खरे कारण कळल्यावर दोघांनाही खूप पश्चाताप झाला. खरोखरच आपले चुकले, पैसा कमाविण्याच्या नादात पोटच्या लेकारकडे लक्ष देणे विसरून गेलोत म्हणत दोघेही जोरजोरात रडत होते.

# 13) टोकाचे पाऊल

माधवने राहत्या घरात पंख्याला गळफास लावून आत्महत्या केली असल्याची बातमी हा हा म्हणता म्हणता संपूर्ण गावात पसरली. थोड्या वेळानंतर पोलीस आले आणि त्यांनी पंचनामा केला. त्याच्या खिशात एक चिठ्ठी सापडली त्यात लिहिलं होतं की, माझ्या मृत्यूस संस्थेचे अध्यक्ष आणि शाळेचे मुख्याध्यापक जबाबदार आहेत. त्यांनी मला मानसिक, शारीरिक आणि आर्थिक त्रास दिल्यामुळे मला हे टोकाचे पाऊल उचलावे लागत आहे. त्यामुळे या दोघांना अजिबात माफ करण्यात येऊ नये. संस्थेचे अध्यक्ष आणि शाळेचे मुख्याध्यापक यांना ही गोष्ट कळाली तसे ते दोघे फरार झाले. पोलीस त्यांच्या घरी जाऊन आले मात्र ते काही सापडले नाहीत. बायका-लेकरासह ते कुठे तरी दूर निघून गेले. माधवच्या आत्महत्येविषयी गावातील प्रत्येकजण हळहळ व्यक्त करत होता. प्रत्येकांच्या तोंडून त्यांच्याविषयी चांगलेच शब्द बाहेर पडत होते. अन्यायाविरुद्ध लढा द्यायला पाहिजे होता असे प्रत्येकजण म्हणत होते. पण प्रत्यक्षात त्याच्यावर जे प्रसंग ओढवले ते खरंच खूप कठीण होते का ? ज्यामुळे माधवला असे टोकाचे

पाऊल उचलावे लागले. माधव हा चांगला शिकलेला, सुशिक्षित, साधा, भोळा आणि नाकासमोर चालणारा मनमिळाऊ स्वभावाचा होता. घरात अठरा विश्व दारिद्र्य असून देखील त्याने पदवी आणि बी एडचे शिक्षण पूर्ण केले. तो मुळात हुशार होता त्यामुळे त्याला कधीही नापासी ला तोंड द्यावे लागले नाही. त्याच गावात दहावी पर्यंतची एक संस्था होती. ज्यात त्याचे शिक्षण पूर्ण झाले. बी एडचा निकाल लागला आणि माधव प्रथम श्रेणीमध्ये पास झाला होता. बी एड झाल्यावर शिक्षकांची नोकरी नक्की मिळते या आशेवर त्याने वेगवेगळया शाळेत जाऊन आला. पण प्रत्येक ठिकाणी त्याच्या हुशारी पेक्षा पैश्याला जास्त मागणी होऊ लागली. माधव जवळ पैसा नव्हता त्यामुळे त्याला कोठेच नोकरी मिळत नव्हती. दिवसेंदिवस त्याचे दिवस खूपच कठीण होऊ लागले. मिळेल ते काम करत तो कसेबसे दिवस काढत होता. गावातील संस्थेचे अध्यक्ष एके दिवशी रस्त्याने जातांना माधवला रस्त्यावर काम करतांना पाहिले. त्याला माधवची कीव आली. त्याने घरी भेटायला येण्याचे कळविले. तसा तो सायंकाळी घरी गेला. अध्यक्षांनी त्याची चांगली विचारपूस केली, चौकशी केली आणि त्यांच्या शाळेवर शिकवायला येण्यास सांगितले. महिन्याकाठी चार ते पाच हजार रुपयांच्या नोकरीवर माधव शाळेत शिकवायला जाऊ लागला. अध्यक्ष साहेब खरोखरच देवमाणूस होता. असेच वर्ष दोन वर्षे

सरले. माधव शाळेत छान शिकवू लागला होता. त्यामुळे त्याची प्रसिद्धी ही वाढली होती मात्र त्याच्या वेतनात काही वाढ झाली नव्हती. एके दिवशी त्याने अध्यक्ष साहेबांना वेतन वाढवून द्यावे आणि शाळेत कायमची नोकरी द्यावी म्हणून विनंती केली. साहेबांनी मान्य देखील केली. येत्या जून महिन्यापासून माधवला शाळेत कायम करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. माधवला त्यादिवशी खूप आनंद झाला. काही दिवसानंतर आपण ज्या शाळेत शिकलो त्याच शाळेत कायम होणार याचा त्याला खूप अप्रुप वाटत होतं. पण माधवचं नशीब खोटं होतं म्हणूनच की काय फेब्रुवारी महिन्यात अध्यक्ष साहेबांचा हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालं. माधवच्या जीवनात अध्यक्षांचे जाणे टर्निंग पॉईंट ठरले. अध्यक्षाच्या जाण्याने त्याच्या जागी संस्थेचे अध्यक्ष म्हणून त्यांच्या मुलाची नेमणूक करण्यात आली. तो तिशीच्या आतील तरुण आणि लाडात वाढलेला होता. त्याला कोणाच्या सुखदुःखाची काही काळजी नव्हती. तो आपल्याच मस्तीत जगत असे. मुलगा अध्यक्ष झाल्यापासुन शाळेचे जे चांगले वैभव होते ते बदलायला सुरुवात झाली. शाळेचे मुख्याध्यापक आणि अध्यक्ष आता एकाच ताटात जेवणारे बनले. मुख्याध्यापकानी त्याला खाण्याची, पिण्याची आणि इतर वाईट गोष्टीची सवय लावली. त्याला देखील तेच गोड वाटत होते. पूर्वीच्या अध्यक्षांनी जून पासून

माधवला कायम करण्याचे आश्वासन दिले होते आणि त्यांनी त्याचे काम केले होते. माधव ला शाळेत कायम नोकरीवर घेण्याचे पत्र संस्थेला मिळाले. मुख्याध्यापकाने सर्वप्रथम ते पत्र अध्यक्षाला दाखविले. माधवला आपल्या संस्थेत फुकटात लागला आहे. आता तो चार पाच हजार रुपयेवर नोकरी करत आहे मात्र या पत्राने तो पंचवीस ते तीस हजार पगार उचलतो. तेंव्हा त्याच्याकडून काही तरी देणगी घ्यावी. अध्यक्षांच्या कानात त्याने ही फुंकणी मारली. माधवला पत्र आल्याची बातमी कळाली तसा तो खूप आनंदी झाला. त्याने मुख्याध्यापकाकडे पत्राची मागणी केली तर त्याने अध्यक्षाकडे जा असे सांगितले. माधव मग अध्यक्षांच्या घरी गेले आणि पत्राची मागणी केली. त्यावेळी अध्यक्ष महोदय घरात बसून दारूचे पेग घशाखाली घालत होते. एवढ्या सकाळी दारू पित असल्याचे पाहून माधवला देखील कसे तरी वाटत होते. दारूच्या नशेत तो म्हणाला, एक लाख रुपये घेऊन ये, तरच तुला हे पत्र मिळेल, अन्यथा नाही. माधव ने खूप विनंती केली. पण तो ऐकण्याच्या मनस्थितीमध्ये नव्हता. शेवटी नाराज होऊन तो आपल्या घरी परत आला. दुसऱ्या दिवशी सकाळी शाळा भरल्या नंतर मुख्याध्यापकाने कालच्या विषयी माधवला विचारणा केली. माधवने घडलेली घटना सांगितली. त्यावर मुख्याध्यापकाने मधला मार्ग सांगितला तो म्हणाला, एकदाच पैसे देता येत नसेल तर

महिन्याला दहा हजार रुपये भरून एक लाख पूर्ण कर. माधवला हे पटले. मग त्याने मुख्याध्यापका ला सोबत घेऊन अध्यक्षांच्या घरी गेले. मुख्यध्यापकाने सांगितल्याप्रमाणेच तो बोलला आणि त्याची नोकरी तिथे टिकली. काही ही त्रास न घेता फुकटचे एक लाख रुपये मिळाले म्हणून त्यादिवशी दोघांनी जंगी पार्टी केली. नोकरी कायम झाल्यावर दिवाळी च्या सत्रात माधवचे लग्न झाले. सुशील आणि सुंदर मुलीसोबत माधवचे लग्न झाले. नजर लागावी अशी गोरीपान आणि सोज्वळ बायकोमुळे त्यांचा संसार सुखात चालू होता. दरमहा दहा हजार रुपये देत देत एक लाख रुपयांची देणगी माधवने दिली. एवढ्या गोष्टीवर खुश होणारे ते कसले मानव ! काही दिवसानी अध्यक्षांचा वाढदिवस आहे आणि ते साजरा करण्यासाठी त्यांनी माधवला पंचवीस हजारांची मागणी केली. माधवला नकार देणे अशक्य होते. दरवर्षी वाढदिवसाला ही रक्कम काढून ठेवावीच लागायची. एके वर्षी शाळेत वर्गखोली बांधायचे आहे म्हणून सर्वांकडून एक लाख रुपये देण्याची मागणी झाली. माधवला हे सर्व जड जात होतं. घरात कमावता एकटाच असल्यामुळे पगारातील एक ही पैसा मागे पडत नव्हता. हे एक लाख रुपये कसे द्यायचे याची त्याला काळजी लागून होती. पैसे देऊ शकत नाही म्हटलं तर काय होते की, मनात नाना प्रकारच्या शंका. मागे असेच एका शिक्षकाने पैसे देण्यास नकार दिल्यामुळे

त्याला संस्थेतून काढून टाकण्यात आले होते. तशी पाळी येऊ नये म्हणून अध्यक्ष मागेल तेवढे पैसे माधव गुपचूप देत होता. अधुनमधून मुख्याध्यापक देखील माधवला त्रास देऊ लागला. तुला चांगले शिकविता येत नाही, पालकांची तुमच्याबाबत तक्रार आहे, मुलांवर तुमचे नियंत्रण नाही असे अनेक आरोप माधववर लावण्यात येऊ लागले. या सर्व प्रकारामुळे माधव प्रचंड मानसिक तणावाखाली जीवन जगत होता. माधवचा काही एक दोष नसतांना त्याला हकनाक त्रास दिल्या जात आहे हे इतर सहकार्यांना कळत होते मात्र ते काही करू शकत नव्हते. अध्यक्षांच्या मुलाचे लग्न जमले होते. काही दिवसांनी घरात लग्न सोहळा पार पडणार होता. त्यांच्या घरात सर्वत्र सनई चौघडा वाजत होता. सर्वत्र आनंदाचे वातावरण होते. जो तो आपल्या कामात व्यस्त होते. माधवला देखील या लग्नकार्यात काम करणे क्रमप्राप्त होते. जाणूनबुझुन माधवला या लग्नकार्यात अगदी छोटे काम देण्यात आले होते. शाळेत शिकविणारा तो एक हुशार शिक्षक मात्र येथे त्याची फारच गोची झाली. त्याला आलेल्या पाहुण्यांना पाणी देण्याचे काम देण्यात आले. तो नकार देऊ शकला नसता, त्याला त्याच्या नोकरीची काळजी लागली होती. या कामामुळे माधव खूपच नाराज झाला.  लग्नकार्य संपले होते. माधवच्या घरातील सर्व मंडळी त्याच लग्नासाठी गेले होते. त्याला तो अपमान सहन झाला

नाही, तो थेट घरी आला. घरात कुणीही नव्हते. घरी आल्याबरोबर रागाच्या भरात त्याने दार लावून घेतलं आणि छताच्या पंख्याला दोर बांधून गळफास घेतली आणि नेहमी अपमानित होणाऱ्या आपल्या जीवाला समाधान केलं.

# 14) कुलदीपक

शिल्पाला मुलगा झाला ही बातमी तिच्या सासूच्या कानावर गेली तशी तिची सासू कमलाबाई खूपच आनंदून गेली. वंशाला दिवा मिळाला म्हणून शेजारी पाजारी आनंदाने सांगत सुटली. शिल्पा सरकारी दवाखान्यात होती, सोबत तिचा नवरा दीपक देखील हजर होता. घरातील काम आटोपून कमलाबाई लगेच दवाखान्यात जाण्यासाठी निघाली. तिला खरोखरच आज खूप आनंद झाला होता. कारण ही तसेच होते, तिला देखील चार मुलींच्या नंतर दीपक झाला होता. तर सुनेला देखील चार मुलीनंतर आज मुलगा झाला. वंश चालविण्यासाठी मुलगा हवाच हा कमला बाईच्या सासूचा तिला तगादा होता, तोच तगादा तिने आपल्या सुनेकडे लावून धरला. तिला सगळ्या गोष्टीची जाणीव होती पण ती त्यातून काही शिकली नाही आणि आपला हट्ट पूर्ण करून घेतली. काही वेळांत ती दवाखान्यात पोहोचली, पाळण्यात तिचा नातू हात पाय हलवत खेळत असतांना पाहून तिच्या डोळयातून आनंदाश्रू गळाले. नातूच्या आनंदात ती सारेच विसरून गेली होती. या वंशाच्या दिव्याला जन्म देणारी सून कशी आहे याची विचारपूस करण्याचे तिला जराही भान राहिले नाही. थोड्या वेळाने ती

भानावर आली आणि आपल्या दीपकला विचारू लागली, "सुनबाई कुठे आहे ? बाजूच्या रूममध्ये ठेवलं आहे का ? " यावर दीपक काही बोलत नव्हता, खाली मान घालून उभा होता, त्यांच्यामध्ये बोलण्याची शक्तीच नव्हती. तिथे उभे असलेल्या नर्सने सांगितले की, " बाळाची आई आता या जगात नाही राहिली, बाळाला जन्म देताक्षणी काही वेळांत तिचा मृत्यू झाला."

हे ऐकून कमलाबाईला अस्वस्थ वाटू लागले. हाय रे देवा हे काय झाले ? असे ओरडत कपाळावर हात मारत रडू लागली. पण वेळ निघून गेली होती. आता काही जरी केले तरी बाळाची आई शिल्पा काही परत येणार नव्हती. दीपकने आईला खूप समजावून सांगितलं होतं पण कमलाबाई त्याचे काही एक ऐकत नव्हती, वंशाचा दिवा पाहिजे म्हणजे पाहिजे असा तिचा हट्ट होता. त्याच हट्टापायी आज शिल्पा जग सोडून गेली होती. तिशीच्या वयात तिचं संपूर्ण आयुष्य संपून गेलं.

शिल्पा दिसायला सुंदर जरी नसली तरी नाकी डोळे छान असल्यामुळे पहिल्याच मुलगी पाहणे कार्यक्रमात दीपकने तिला पसंद केले होते. दीपक शहरातील एका दुकानात काम करत होता. तिला देखील दीपक पसंद होता. त्या दोघांचे थाटामाटात लग्न पार पडले. त्यांचा सुखाचा संसार सुरू झाला. तिला दिवस गेल्याचे

कळताच सासूबाईला खूप आनंद झाला. ती नेहमी म्हणायची, "बाई, मला नातूच हवा." तिचं हे नेहमीचे बोलणे ऐकून शिल्पाला टेंशन येत असे. मुलगा किंवा मुलगी होणे आपल्या हातात नाही असे ती आपल्या सासूबाईला सांगायची पण ती आपला हट्ट काही सोडत नसे. त्या दिवशी खूपच पोटात कळ उठल्यामुळे दीपक तिला घेऊन सरकारी दवाखान्यात गेला. तिची प्रसूती झाली आणि मुलगी झाली. मुलगी झाली हे कळताच शिल्पाच्या चेहऱ्यावर काळजीची एक लकेर उठून दिसत होती. सासूबाई आता खूप बोलणार याची तिला भीती वाटत होती. मात्र त्याच वेळी दीपक तिला धीर देत होता. सासूबाईला मुलगी झाल्याची गोष्ट कळाली तसे ती हुप्प होऊन बसली. घरात सून आली सोबत लक्ष्मी घेऊन आली तरी तिचे तिला काही सोयरसुतक नव्हते. ती आपल्या सुनेचा तिरस्कार करू लागली. शिल्पाचा यात काही एक दोष नव्हता तरी देखील तिला याचा त्रास सहन करावा लागत होता. असेच दिवस सरत होते. शिल्पाला दुसऱ्यांदा दिवस गेले तसे पुन्हा सासूबाईचा एकच तगादा चालू होता. " मला नातू हवा." शिल्पाचे दुर्दैव असे होते की यावेळी देखील तिला मुलगीच झाली. दीड वर्षाच्या अंतरात ही दुसरी मुलगी झाली होती. कुटुंब नियोजन करण्यावर दीपक आणि शिल्पा यांचे एकमत झाले होते मात्र कमलाबाई यास विरोध करत होती. " नातू म्हणजे वंशाचा दिवा आहे. त्याशिवाय घर कसे

चालणार ? ते काही नाही, नातू हवाच ". आईच्या हट्टापुढे दीपकला देखील काही करता येत नव्हते. त्यानंतर शिल्पाला एक वेळा गर्भपाताचा सामना करावा लागला आणि नंतर दोन मुली झाल्या. यामध्ये तिचे शरीर पूर्णपणे खंगुन गेले. सासूबाईला काही म्हणावं तर ती म्हणत असे, " चार मुलीवर मला दीपक झालंय, तुला ही तसंच होईल. या घराची तशी परंपरा आहे. पाच लेकरं जन्मास घालून ही मी कशी ठणठणीत आहे. तुला काय होईल ?" असे ती नेहमी बोलायची. तिच्या तब्येतीकडे अजिबात लक्ष दिले नाही. दिवसेंदिवस तिची तब्येत खालावत चालली होती. डॉक्टरने देखील तिच्या जीवाला धोका असल्याचे सांगितले होते मात्र सासूबाईने त्याकडे अजिबात लक्ष दिले नाही. शेवटी जे होऊ नये तेच झालं. नातूच्या हट्टापायी शिल्पाला आपला जीव गमवावा लागला. नातू झाल्याचा आनंद झाला मात्र या बाळाला सांभाळणारी आई या जगात राहिली नाही याचे दुःखही वाटत होते. वंशाच्या दिव्यासाठी नाहक हट्ट केला याचा राहून राहून कमलाबाईला पश्चाताप वाटत होता. दीपक भान हरवल्यासारख शून्य नजरेने छताकडे पाहत उभा राहिला. त्याच्या डोळ्यासमोर चार मुली आणि या नवजात मुलाचे जीवन मरणाचा प्रश्न कसा सोडवावे याची काळजी लागली होती.

# 15) गोष्ट एका आंबेगावाची

मोहन आज पाच वर्षानंतर मामाच्या गावाला जायला मिळणार म्हणून फारच खुशीत होता. त्यापूर्वी तो उन्हाळी सुट्टीत दरवर्षीच जायचा. पण मोहनच्या वडिलांची बदली जिल्ह्याच्या ठिकाणी झाल्यापासून तो मामाच्या गावाला गेला नव्हता. त्याची दहावीची परीक्षा नुकतीच संपलेली होती. पण लहान बहीण नीताच्या परिक्षेमुळे तो अडकून पडला होता. नीता यावर्षी सातवीला होती. सुमारे पाच वर्षांपूर्वी म्हणजे पाचवीला असतांना त्याला मामाच्या गावी जायला मिळाले होते. त्यानंतर तो आज मामाच्या गावी जाणार होता आणि सोबत त्याची आई आणि बहीण नीता दोघे जण होते. सकाळी पहिल्या गाडीला जाण्यासाठी ते तिघे घराबाहेर पडले. आंबेगावला जाणारी बस फलाट क्रमांक चार वर लागली होती. मोहन आता हुशार झाला होता कारण बस मध्ये दस्ती ( रुमाल ) टाकून सीट राखीव करण्याचे काम आज त्याने केलं होतं. तिघेही बसमध्ये चढले. खिडकीला बसण्यावरून मोहन आणि नीता यांच्यात वाद सुरू झाला. पण आईने मध्यस्थी करून शेवटी नीताला खिडकीला बसविले, आई मध्ये बसली

आणि मोहन बाजूला हिरमुसला होऊन बसला. आज त्याने सीट धरून देखील त्याला खिडकी मिळाली नाही याचा राग आला होता. बस सुरू झाली तशी त्याचा राग देखील निवळला. बस ज्या वेगाने मामाच्या गावाच्या दिशेने धावू लागली त्याच वेगात मोहनचे मन देखील मामाच्या गावाच्या दिशेने धावू लागलं. मामाचं गाव आंबेगाव म्हणजे खरोखरच त्या गावात खूप आंबे पिकायचे. प्रत्येकांच्या शेतात एक तरी आंब्याचे झाड होते. उन्हाळयात मामाच्या गावात खूप आंबे खाण्यात यायचे. आंबे ते ही खूपच गोड. मोहनला आंबे खूपच आवडायचे. आंबे खाण्यासाठीच तो मामाच्या गावी जाण्याचा हट्ट धरायचा. मामाचे शेत त्यांच्या घरापासून फार दूर नव्हते. सकाळी जेवण झाले की, मामा-मामी मामेभाऊ सुरेश, त्याचा मित्र सचिन, सोहेल, भूषण आणि मामे बहीण राणी हे सारे जण त्या शेतातल्या आंब्याच्या झाडाखाली एकत्र यायचे. मामा-मामी शेतात ऊन होण्याच्या अगोदर थोडे काम करायचे आणि दुपारच्या वेळी झाडाखाली येऊन बसायचे. दुपारचं जेवण देखील त्याच झाडाखाली होत असे. हे सारे चित्र त्याला जशास तसे दिसू लागले होते. त्याच शेतात पलीकडे चिंचेचे मोठे झाड होते. आंब्यासोबत चिंचादेखील खाण्याची मजा यायची. लांबुळी चिंच आठवताच मोहनच्या तोंडाला पाणी सुटलं होतं. चिंचेच्या झाडाला लागून एक लिंबाचे झाड होते. त्या झाडाखाली

सुरेश आणि त्यांच्या मित्रांसोबत मोहन देखील खेळ खेळायचा. गोट्या खेळण्याचा डाव खूप रंगत असे. मोहनचा राजा राणी हा गोट्याचा आवडता खेळ होता. दूर दुरून गोट्या नेमाने उडवण्यात मोहन तरबेज होता. आंब्याच्या कोयीचे ही खेळ खेळायचे. सोमवार-मंगळवार खेळ खेळताना खूपच मजा यायची. पकडम पकडाईचा खेळ संपला की ते सर्वजण सूरपारंब्याचा खेळ खेळायचे. राणी आणि नीता दुरून त्यांचा खेळ पाहत बसत. दुपार झाली की मग थोडंस काही तरी खायचे. मामी सर्वांची आवडती उडदाची दाळ आणि भाकर आणायची. सर्वजण छान पैकी जेवण झाल्यावर त्यांच्या गप्पा रंगायच्या. मामाच्या शेताजवळून एक हायवेचा रस्ता गेलेला होता. त्यामुळे सर्व मुले रस्त्यावरील गाड्या पाहून उड्या मारत असे. सोहेल नावाचा मित्र प्रत्येक गाड्याचे नाव ओळखण्यात खूपच हुशार होता. प्रत्येक गाडीची तो माहिती देत असे. मोहनला राहून राहून सोहेलचे आश्चर्य वाटायचे. एवढी माहिती त्याने कशी गोळा केली ? याचा तो विचार करत असे. यातच सायंकाळ केंव्हा व्हायची काही पत्ता लागायचा नाही. सूर्य अस्ताला जाऊ लागला की सारे जण आनंदाने नाचत नाचत घरी परतत असे. मामाचं घर काही मोठं नव्हतं मात्र अंगण खूप मोठं होतं. रात्रीचे जेवण उरकले की, सारे जण त्या अंगणात शुभ्र चांदण्याच्या प्रकाशात गप्पा, गाणी गोष्टी करत झोपी जात असत.

याच विचारांच्या तंद्रीत मामाचे गाव कधी आले मोहनला कळालेच नाही. आईने त्याला हलवून जागे केले, मोहन, चल आंबेगाव आलं. हे ऐकून मोहन जागे झाला आणि बसच्या खाली उतरला. दुपार झाली होती. बसमधून उतरल्या बरोबर मोहन सभोवती नजर फिरवली. पाच वर्षांपूर्वीचा आंबेगाव त्याला कुठेच दिसत नव्हते. ज्या झाडाखाली बस थांबत होती ते झाड दिसत नव्हते. तो आईला म्हणाला, आई हे मामाचं गाव नव्हे, हे बघ इथे ते मोठं झाडच नाही जेथे बस थांबते. यावर मोहनची आई त्याला समजावून सांगितली की, हेच मामाचे गाव आहे. ते झाड आत्ता राहिलं नाही. इथे बसस्थानक होणार आहे म्हणून त्याला तोडलं, चल आत्ता. रस्त्याने जातांना मोहनला उन्हाचे चटके जाणवत होते. लहान असताना मामाच्या गावात कधीच एवढं ऊन लागलं नाही असे मनात विचार करू लागला. मामाचं घर बसस्थानकाच्या जवळच होतं. पाच एक मिनिटांत मामाच्या घराजवळ आले. मामाचे ते छोटेसे घर आत्ता वाढलं होतं. समोरच्या अंगणात टिन शेड टाकून मामाने घराचा विस्तार केला होता. रात्रीला चांदण्याच्या शुभ्र प्रकाशात झोपण्याचा मोहनचा मोह आत्ता पूर्ण होणार नव्हता. आंबेगावात पूर्ण बदल झाल्यासारखा वाटत होता. मोहनला कधी एकदा शेतात जाऊ असे वाटत होते. हात-पाय धुण्यासाठी न्हाणीघरात गेला तर तेथे दोन-तीन बकीट पाणी शिल्लक होतं.

मामी स्वयंपाक घरातून आवाज दिली. आज नळाला पाणीच आलं नाही. कमी पाण्यात हात-पाय धुवा. मोहनला कसं तरी वाटलं. पाच वर्षांपूर्वी दोन-दोन बकीट भरून पाण्याने अंघोळ करायचो तर आज हात-पाय धुवायला पाणी नाही. कसे तरी हात-पाय धुवून घरात आल्याबरोबर मोहनने सुरेशला घेतलं आणि शेताकडे जाण्यास निघाला. मामीने अरे थांब म्हटल्यापर्यंत ते घराच्या बाहेर पडले होते. सुरेशचे मित्र बरेच जण बाहेरगावी शिकायला गेले होते. फक्त एक सोहेल तेवढा घरी होता. त्यालाही सोबत घेतले आणि तिघेजण शेतात गेले. शेतात गेल्यावर मोहनने जे चित्र पाहिले ते पाहून त्याला रडायलाच कोसळले. शेतात सर्वत्र ऊन म्हणजे ऊन, तेही रखरखतं ऊन एवढंच दिसत होतं. त्या शेतात आंब्याचे, चिंचाचे आणि लिंबाचे कोणतेच झाड दिसत नव्हते. शेताचा आकार देखील खूप कमी झाला होता. शेताच्या बाजूने जो हायवे रस्ता होता तो मात्र पूर्वीपेक्षा खूप मोठा झाला होता. एका वेळी चार वाहने जातील एवढा मोठा झाला होता. हे सारं पाहून तो खूप नाराज झाला. हिरमुसला चेहरा घेऊन तो मामाच्या घरी परत आला. त्याला कशात ही मन रमेना. सायंकाळी जेवताना त्याने मामाला याचे कारण विचारले असता मामा म्हणाला, शेताच्या बाजूने सरकारने मोठा हायवे रस्ता काढला, ज्यात आपली अर्धी शेती गेली. त्या अर्ध्या शेतात आंब्याची, चिंचाची, लिंबाची आणि इतर सर्व झाडे

गेली. त्याच्या बदल्यात आम्हाला सरकारने पाच लाख रुपये दिले. त्या रस्तावरील अनेकांच्या शेतातील झाडे तोडली गेली. आता आमचे गाव आंबेगाव म्हणण्यासारखे नाही असे म्हणून मामा देखील नाराज झाला. ती सर्व कहाणी ऐकून मोहन खूप नाराज झाला. रात्री त्याला काही केल्या झोप येत नव्हती. शेवटी मनात एक विचार करून झोपी गेला. सकाळ झाली. मोहनने सुरेशला कानात काही तरी सांगितलं. तसे सुरेशनी तयारी केली. कुदळ आणि फावडे घेऊन मोहन, सुरेश आणि सोहेल शेतात गेले. शेतात दहा-वीस खड्डे केली आणि त्या दहा-वीस खड्यात आंब्याची कोय टाकून ठेवली. सुरेश आणि सोहेलला काळजी घेण्याविषयी सुचविले. दहा-पंधरा दिवसांनी मोहन आपल्या गावी परत आला. पावसाळा सुरू झाला. श्रावण महिन्यात जोरदार पाऊस झाला. असेच एके दिवशी पोस्टमन मोहनच्या घरी एक पत्र घेऊन आला. ते पत्र सुरेशचे होतं, त्यात त्यानं लिहिलं होतं की, सर्वच खड्यातून आंब्याची रोपे बाहेर आली. त्याला काटेरी कुंपण करण्यात आले आहे. मोहनला त्याचे पत्र वाचून खूप आनंद झाला. मग त्याने सुरेशला पत्र लिहिलं,

*प्रिय मित्र सुरेश,*

*आंब्याची रोपे बाहेर आली हे वाचून खूप आनंद झाला. त्या झाडांची नीट काळजी घे. पावसाळा संपल्यावर रोज त्याला पाणी घाल. मला परत तुझ्या घरी खूप खूप आंबे खायची आहेत. परत एकदा आपलं गाव आंबेगाव करायचं आहे, हे ध्यानात ठेव. मी परत येणार आहे उन्हाळी सुट्टीत. सोहेलला माझा नमस्कार सांग आणि मामा-मामीला साष्टांग दंडवत.*

*तुझाच मित्र*

*मोहन*

पत्र घेऊन तो पोस्टात गेला आणि पोस्टाच्या डब्यात तो पत्र टाकल्यावर खूप आनंदी मनाने घरी परतला.

# 16) भिजवणारा पाऊस

घड्याळात तीन वाजले होते. बाहेर काळेभोर आभाळ जमू लागले होते. पाहता पाहता सर्व ढग एकत्र झाले आणि पाऊस सुरू झाला. तसं त्याच्या मनात चलबिचल चालू झालं. सकाळी शाळेला निघत असतांना निरभ्र आकाश होतं. पाऊस पडेल असा कोठेही अंदाज नव्हता. तसं हवामान खात्याने अंदाज सांगितलं होतं की, पुढील चार दिवस मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता म्हणून. पण त्याने त्या हवामान खात्याच्या अंदाजाकडे नजरअंदाज केला आणि सोबत रेनकोट न घेता शाळेला निघाला. मनातल्या मनात स्वतः विरुद्ध चिडून उठला. गेल्या दहा दिवसापासून रोज रेनकोट सोबत होतं पण पाऊस काही पडला नाही. नेमकं आजच रेनकोट सोबत नाही आणि जोरदार पावसाला सुरुवात झाली. शाळा सुटेपर्यंत एक तासांचा अवकाश होता. तोपर्यंत पाऊस पडून निघून जाईल म्हणून खिडकीतून तो पाऊस न्याहाळत बसला. पाऊस वाढत होता तसा वर्गातली मुले गोंगाट करत होती. पाऊस वरचेवर वाढतच होता. अर्ध्या पाऊण तासांनी पावसाने आपला जोर कमी केला तसं त्याने सर्व मुलांना घरी जाण्यास सांगितले. पोरं ही छत्री

किंवा रेनकोट आणलं नव्हते म्हणून आपल्या शाळेची बॅग डोक्यावर धरून धूम ठोकली. शाळेच्या वर्गखोल्या व्यवस्थित लावून घेतलं आणि तो ही घरी जाण्यास तयार होऊ लागला. मैदानात येऊन घराच्या रस्त्याकडे एकवार नजर फिरवली तर तिकडे खूपच काळे कुट्ट ढग दिसत होते. आज भिजत भिजत घरी जावं लागेल याची काळजी त्याला वाटत होती. लहान असतांना खूप आवडणारा हा पाऊस त्याला आज नको वाटत होतं. पावसात गाडी चालवत जाणे त्याला अवघडल्यासारखं वाटत होतं. त्याचसोबत त्याला जास्त काळजी वाटत होती ती मोबाईलची. मोबाईल जर पाण्यात भिजला तर खराब होऊन जाईल, याची त्याला चिंता लागली. काय करावं ? या विचारात असतांना त्याला जेवण्याच्या डब्याची आठवण आली. त्याचा जेवणाचा डबा मोबाईल एवढा लांब आकाराचा होता. लगेच त्यानं आपला मोबाईल स्विच ऑफ केला आणि डब्यात ठेवून ते डबा गाडीच्या टॅंकवरील कव्हर मध्ये सरकवला. त्याची एक काळजी मिटली होती. पावसाचा जोर कमी होता पण रिमझिम चालूच होतं. पाऊस अजून कमी होईल म्हणून थोडा वेळ वाट पाहिलं, थोडा वेळ थांबला. पण पाऊस काही थांबेना. शेवटी कंटाळून आपल्या डोक्यावर टोपी लावली आणि डोळ्याला चष्मा लावून गाडी चालू केली. पावसाचा पहिला थेंब अंगावर पडला तेंव्हा त्याला झटका

लागल्याचा अनुभव आला. गाडी अगदी सावकाश चालवत तो पुढे जाऊ लागला. उलट दिशेने वारा जोरात वाहत होता. पाच दहा मिनिटाच्या प्रवासात त्याचे कपडे सर्व ओले झाले. हळूहळू त्याचे अंतर्वस्त्र देखील ओले होण्यास सुरुवात झाली. तसे त्याला थंडी वाजण्यास सुरुवात झाली. जसे जसे गाव जवळ येत आहे असे वाटत होते तसे तसे पावसाचा जोर वाढतच होता. त्याच्या अंगात आता पूर्ण थंडी भरली होती. गाडी वेगात पळविणे त्याला अशक्य वाटू लागले. त्यातच विजा चमकणे आणि ढगांचा गडगडाट देखील त्यात सहभागी झाले त्यामुळे त्याच्या मनात अजून भीती वाटू लागले. चाळीस मिनिटाच्या प्रवासानंतर तो घरी पोहोचला. पूर्ण अंगातून पाणी गळत होतं. घरी आल्याबरोबर ती म्हणाली, " म्हटलं होतं, रेनकोट सोबत घेऊन जा म्हणून, पण माझं ऐकलं नाहीत.." यावर त्याला अजून तिचा राग आला पण करावं काय ? तिचं सकाळी ऐकलो असतो तर आज पावसात भिजण्याची वेळ आली नसती. पण तिचे बोलणे खाली टाकण्यासाठी तो म्हणाला, " पहिल्या पावसात भिजण्याची मजा तुला काय कळते ? पावसात भिजलं तरच त्याचा आनंद कळू शकते ...!" आपल्या मनाला रिझवण्यासाठी तसा तो बोलला पण आतून खजील झाला होता. तिने लगेच आद्रकचा गरमागरम चहा आणून दिला. बाहेर गॅलरीत बसून चहाचा घोट घेत घेत तो पावसाला म्हणाला, " आत्ता पड की


तुझ्या मनासारखं..." पण...... काही वेळात पाऊस थांबला, काळेकुट्ट ढगांच्या जागी आता पांढरे आभाळ दिसू लागले होते .....

## 17) पाच रुपये

आभाळ गच्च भरून आलं म्हणून रेल्वे स्टेशनला जाण्याच्या घाईत तो ऑटो पाहू लागला. पावसाच्या धास्तीने प्रत्येकजण मिळेल त्या ऑटोमध्ये बसून जात होते थोड्याच वेळांत त्याला देखील ऑटो मिळालं. तसं तो रेल्वे स्टेशनला चला म्हणून ऑटोमध्ये बसून घेतलं. ऑटोत बसल्याबरोबर जोराचा पाऊस सुरू झाला. ऑटोमध्ये बसून देखील त्याच्या अंगावर पावसाचे पाणी पडतच होतं. पाऊस तसं खूप जोरदार पडत होता. काही वेळात तो रेल्वे स्टेशनवर पोहोचला. जोरात पाऊस चालूच होता पण ऑटो मधून उतरणे गरजेचे होते. सोबत छत्री नव्हतं आणि पावसात भिजत स्टेशनमध्ये जाण्याशिवाय पर्याय देखील नव्हता. ऑटोमधून उतरून धावत-पळत पावसात भिजत कसेबसे स्टेशनमध्ये पोहोचला. एका मिनिटात पावसाने त्याला ओलेचिंब करून टाकले होते. टिकीट काढून प्लॅटफॉर्मवर रेल्वे येण्याची वाट पाहू लागला. पूर्ण अंग भिजल्याने त्याला थंडी वाजू लागली होती. एक गरम चहा प्यावे म्हणून तो कँटीन शोधू लागला. जास्त वेळ शोधावं लागलं नाही. थोड्याच अंतरावर त्याला कँटीन दृष्टीस पडली. तसा तो कँटीन जवळ गेला आणि चहा पिण्याच्या अगोदर काही खावं


म्हणून त्या कँटीन मधले समोसे जे की थंड होते पण तो गरम आहे म्हणत होता. त्याच्याशी वाद घालत बसायला त्याचं डोकं चालत नव्हतं, पोटात भुकेचं आगडोंब उसळला।होता. त्याने समोसे घेतले आणि कधी एकदा पोटात टाकावं म्हणत तो खाण्यास सुरू केला. तिथेच बाजूला एक दहा वर्षाची मुलगी त्याला पाहत होती. नकळत त्याचं तिकडे लक्ष गेलं. तिला खूप भूक लागली असेल असं त्याला वाटून गेलं. तो इशारा करून खायचे का ? असं विचारलं. तिने लगेच मानेने होकार दिलं. त्याने कँटीन वाल्याला अजून समोसे देण्यास सांगितलं. ते घेऊन त्याने त्या मुलीला दिलं. मुलीने ते समोसे घेऊन पटापट खाण्यास सुरुवात केली. अजून पाहिजे का ? असं तो विचारलं तेंव्हा ती नको असं म्हणाली. जवळच नळ चालू होतं. ती नळाजवळ गेली आणि पोटभर पाणी पिऊन तिथेच एका खुर्चीवर आडवी झाली. त्याने ही हातातला समोसा संपविला आणि कँटीनवाल्याकडून एक पाण्याची बॉटल आणि चहा घेतलं. कँटीनवाल्याने पैसे घेतले आणि पैसे परत दिले. पण त्यात पाच रुपये कमी असल्याचे त्याला आढळले. त्याने पाच रुपयांची मागणी केली. तेंव्हा कँटीनवाला म्हणाला, साब बराबर है। दो समोसे के चालीस रुपये, बॉटल के बिस रुपये और चाय के दस रुपये. हे उत्तर ऐकून त्याला कँटीनवाल्याचा राग आला तो म्हणाला, पण बॉटल तर पंधरा रुपयाला आहे. तुझ्या बोर्डवर लिहिलेलं आहे.

बोर्डाकडे बोट दाखवून तो म्हणाला, पाच रुपये परत करावं लागेल. म्हणत तो कँटीनवाल्या सोबत वाद करू लागला. या वेळांत गाडीचा अजून काही पत्ता नव्हता. सुरुवातीला गरम समोसे आहेत म्हणून थंडच समोसे दिले होते, त्यावेळी त्याच्या पोटात भूक होती आणि डोकं चालत नव्हतं पण समोसे खाल्यावर भूक ही भागली आणि डोकं ही चालायला लागलं. पाच रुपये परत करावेच लागेल म्हणून तो वाद करू लागला. दोघांचे वाद होऊ लागले तसे ती मुलगी त्याच्याकडे पाहू लागली. कँटीनवाला म्हणाला, क्या साब उस बच्ची को बिस रुपये के समोसे खिलाए और पाच रुपये के लिए मुझसे झगडा कर रहे हो. यावर तो म्हणाला त्या मुलीला भूक लागली म्हणून वीस रुपये तिच्यासाठी खर्च केलोय. पण तुला काय झालंय माझे पाच रुपये जास्त घेत आहेस. तुला पाच रुपये जास्त ही दिला असता पण तू खोटा बोलून व्यवहार करतोस म्हणून मला पाच रुपये पाहिजेच. पाच रुपये घेतल्याशिवाय तो कँटीनवाल्याला सोडलाच नाही. ते पाच रुपये घेऊन जाता जाता त्या मुलीजवळ गेला आणि तिच्या हातात ते पाच रुपयांचा शिक्का देऊन आनंदात आपल्या मार्गावर निघाला.





**नासा येवतीकर**


यांची ई साहित्यवरील
पुस्तके
कव्हरवर एक क्लिक
करा आणि – थांबा –
आणि- वाचा.
अखखं पुस्तकच हजर.

















**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे तेरावं वर्ष.**

**नासा येवतीकर यांचं ई साहित्यवर हे नववं पुस्तक.**

नासा येवतीकर हे नांदेडच्या ग्रामीण भगातील शिक्षक. विद्यार्थ्यांप्रती शिकवण्याची व विकासाची प्रचंड तळमळ, देशाबद्दल अतोनात प्रेम आणि उपजत दैवी प्रतिभा यांचे फ़ळ म्हणजे त्यांचे लेखन. ते समाज सुधारण्याच्या हिरीरीने लेहीतात. एक जोमदार ऊर्जा त्यांच्या लेखनात असते. पण अशा लेखकांना योग्य प्रकाशक मिळणं कठीण जातं. एकतर ग्रामीण महाराष्ट्रात प्रकाशक कमीच. त्यात लेखक प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांची पुस्तकं कितीही चांगली असली तरी विकली जात नाहीत. त्यामुळे प्रकाशक नवीन लेखकांची पुस्तकं छापत नाहीत. कधीकधी तर न वाचताच परत करतात. आणि प्रकाशन झालेच नाही तर हे नवीन लेखक प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात अनेक प्रतिभा गर्भातच मारल्या जातात. अगदी ‘‘मृत्युंजय’’कार शिवाजी सावंत यांचं पुस्तक तीन वर्षं कोणी प्रकाशक वाचूनही पहात नव्हता. या दुष्टचक्रातन अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

आता नेटवर नवलेखकांना वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे काम अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान त्यातील एक. ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही.

भविष्य काळात लेखकांना भरघोस मानधन देण्याची ई साहित्यची इच्छा आहे. नवीन उत्कृष्ट लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस स्तुती तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनुप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, स्वीटी महाले, अंबरीश गुरव, अविनाश जामदार, गौरव नायगांवकर, प्रणिता ठाकूर, अनिल पिसे, अनामिका बोरकर, पवन सोनवणे, राजेंद्र

शेळके, पुर्वा राउत, धनंजय कलमष्टे, वैभव तांबटकर, बाळासाहेब शिंपी, नासा येवतीकर असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

मराठीत हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे, आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com